शनिवार । ८ मार्च १९८० । ७५ पैसे

# माणूस

## अस्वस्थ आसाम

नवी
लेखमाला

सतत सहा महिने
सर्व अडचणींवर मात करून,
संघटितपणे आणि चिकाटीने
एक प्रचंड जनआंदोलन
चालविण्याची ताकद
साध्याभोळ्या
असमिया नागरिकात
आली तरी कुठून ?

'माणूस'ने या साठी आपला प्रतिनिधी
आसाममध्ये पाठवला....

# अगाऊ प्राप्तीकर भरणाऱ्यांनो
# १५ मार्च तारखेची आठवण ठेवा

जर आपल्या एकूण प्राप्तीपैकी ७५ टक्के अथवा अधिक प्राप्ती अशा व्यवहारांतून असेल, ज्यांचे संबंधित आकारणी वर्ष १९८०–८१ असून, ते वर्ष १ जानेवारी १९८० अथवा त्यानंतर कोणत्याही दिवशी संपत असेल, तर

* त्यासाठी अगाऊ कराचा अखेरचा हप्ता भरण्याची तारीख १५ मार्च १९८० आहे.
* आपली चालू प्राप्ती व त्यावर भरावयाची अगाऊ कराची रक्कम याचा अंदाज अथवा फेर अंदाज, फॉर्म नं. २९ वर भरून आपल्या प्राप्तीकर अधिकाऱ्याकडे तो फॉर्म पाठविण्याची अखेरची तारीख १५ मार्च १९८० आहे.

**जर**

- आतापर्यंत कर आकारणीसाठी आपल्या प्राप्तीची रीतसर आकारणी झाली नसेल आणि जर आपली चालू वर्षांतील प्राप्ती खाली निर्देश करण्यात आलेल्या रकमेपेक्षा अधिक असेल तर

| | |
|---|---|
| रु. २५०० | जर कंपनी अथवा स्थानिक प्राधिकरण असेल, |
| रु. ३०००० | जर रजिस्टर्ड (पंजीकृत) व्यापारी संस्था असेल, |
| रु. १०००० | जर निर्देशिलेल्या श्रेणीत आपण येत नसाल |

- प्राप्तीकर अधिकाऱ्याने अगाऊ कर भरण्यासाठी, गृहित धरलेल्या आपल्या चालू प्राप्तीपेक्षा, आपल्या अंदाजाप्रमाणे जर प्रत्यक्षप्राप्ती कमी असेल,
- आपल्या एकूण चालू प्राप्तीवर भरावयाची अगाऊ कराची रक्कम, आपल्या अंदाजाप्रमाणे:
  (अ) प्राप्तीकर अधिकाऱ्याने मागितलेल्या अगाऊ कराच्या रकमेपेक्षा अधिक असेल,
  (आ) फॉर्म नं.२८ ए वर पूर्वी भरलेल्या रकमेपेक्षा, अगाऊ कराची रक्कम अधिक असेल
  (इ) फॉर्म नं.२९ वर भरलेल्या अंदाजाप्रमाणे अथवा फेर अंदाजाप्रमाणे अगाऊ कराची रक्कम अधिक असेल,

  ही रक्कम (अ), (आ) अथवा (ई)प्रमाणे १/२ पेक्षा अधिक असेल तर,

**तसेच**

: आपण भरलेल्या अगाऊ कराचा, हिशोबात आपणास फायदा देण्यासाठी, आम्हाला खालील प्रमाणे मदत करा:–

* जर कंपनी असेल तर चालान फॉर्म नं. १५ ए आणि कंपनी नसेल तर चालान फॉर्म नं. १५ वापरा.
- चालानमध्ये सर्व नोंदी सत्य योग्य जागी आणि सविस्तर भरा.
- कृपा करून चालानमध्ये प्राप्तीकराची रक्कम आणि त्यावरील अधिकराची (सरचार्ज) रक्कम, त्यासाठी असलेल्या रकान्यात स्वतंत्रपणे लिहा.

**व्याज आणि भुर्दंड भरण्याचे टाळा. वेळेवर आपला अगाऊ कर जमा करा**

निवेदक
डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन
(रिसर्च स्टेटिस्टिक्स अँड पब्लिकेशन)
इन्कमटॅक्स डिपार्टमेंट
नवी दिल्ली – ११० ००१

davp 79/487
Marathi

# सप्रेम नमस्कार

¤ १६ फेब्रुवारी ८० च्या अंकातील शाम केळकर यांचा लेख वाचला. त्यावर थोडेसे सविस्तर द्यावेसे वाटले म्हणून हा प्रपंच.

'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि श्रीमती गांधी या दोन शक्ती एकत्र आल्या तर-' हे विधान विचार करण्यासारखे तर नाही; परंतु संधिसाधुपणाचे मात्र निश्चित आहे असे वाटते. स्वतःस राजकारणापासून अलिप्त, सांस्कृतिक व हिंदुत्ववादी म्हणविणारी ही संघटना भारतीय संस्कृती व परंपरेचे झेंडे सतत मिरवीत असते. या संघटनेचा लोकशाही, धर्मनिरपेक्षता व समानता या तत्त्वांवर मुळीच विश्वास नाही, हे खरे; परंतु या तत्त्वांवर श्रीमती गांधींचा विश्वास नाही व त्यामुळेच गांधींचे व आर. एस. एस. चे कुठे तरी धागे जुळतील असे म्हणणे मात्र उचित ठरणार नाही. आणीबाणी काळात गांधींना हुकूमशहा ठरवून स्वातंत्र्याची गळचेपी झाली म्हणून म्हणणारे संघवाले 'आमच्या स्वयंसेवकांना सोडून द्या आम्ही आणीबाणीस पाठिंबा देतो' असे म्हटल्याचे आठवत असेलच. तेव्हा यांचे स्वातंत्र्य व लोकशाहीवरचे प्रेम किती खरे आहे हे कळून चुकले.

जनता पक्षास त्यांनी पाठिंबा दिला तो केवळ संघावर बंदी येणार नाही व पडद्यामागून सत्तेचे राजकारण खेळता येईल यासाठीच; परंतु जनता पक्षाचा लवकरच अंत झाल्यामुळे (आर. एस. एस. हे सुद्धा जनता पक्षाच्या अस्तास महत्त्वाचे कारण ठरले आहे हे विसरून चालणार नाही.) परत गांधींच्या राज्यात संघाची गळचेपी होते किंवा काय, ह्या भीतीपोटीच देवरसांनी ही चाल खेळलेली दिसते. 'आमची संघटना राजकारणापासून अलिप्त आहे व कोणत्याही शासनाच्या चांगल्या कार्यक्रमास पाठिंबा देऊ इच्छिते' हा केवळ मुलामा आहे. खरी भीती आहे ती, यांच्या समाजविरोधी कारवायांना पायबंद बसण्याची.

केळकरांनी संघाचा श्रीमती गांधींच्या स्वभावाशी जो संबंध जोडला तो मात्र फारसा उचित वाटला नाही. गांधी हुकूमशाही प्रवृत्तीच्या आहेत, लोकशाहीविरोधी आहेत, ब्राह्मण आहेत हे म्हणणे बरोबर वाटत नाही. पहिली गोष्ट अशी की, गांधी ह्या ब्राह्मणकन्या जरी असल्या तरी त्यांचे सासरघर ब्राह्मण नव्हते. (आपल्याकडे मातृसत्ताकपद्धती नाही.) तेव्हा गांधी ब्राह्मण नाहीत हे लक्षात घ्यायला हवे. तसेच आपल्या मुलांना परदेशी स्त्रीशी विवाह करण्याची परवानगी देणारी स्त्री जातीयवादी कशी असेल? श्रीमती गांधींच्या जीवनापासूनच खरे तर धर्मनिरपेक्षता सुरू होते. तेव्हा गांधींवरील ब्राह्मण्याचा आरोप हा गांधींच्या विरुद्ध अपप्रचार करण्याचाच एक प्रकार आहे.

दुसरी गोष्ट श्रीमती गांधी हुकूमशाही प्रवृत्तीच्या आहेत ही. आणीबाणीच्या काळाचे उदाहरण देऊन आपण गांधींच्या नेतृत्वाचे परीक्षण करताना सतत तोच निकष लावणार असलो तर ते चूक ठरणार आहे. श्रीमती गांधींनाही हे कळून चुकले आहे की, अनेक प्रकारची भिन्नता असलेल्या या देशात ही प्रवृत्ती बाळगून राज्य करणे जमणार नाही. कदाचित पक्षांतर्गत लोकशाही विरोधामुळे गांधींवर हा आरोप करता येईल; परंतु पक्षांतर्गत पूर्ण लोकशाही असलेला जनता पक्ष समर्थ नेतृत्व देऊ शकला नाही ही वास्तवता आहे. याचा अर्थ गांधींच्या पक्षात लोकशाही विरोधी वातावरण आहे असे मात्र नाही. समर्थ नेतृत्व ही पक्षाची पहिली गरज आहे. समर्थ नेतृत्व म्हणजे हुकूमशाही नव्हे!

यामुळे संघास व गांधींस एकमेकांबद्दल आपुलकी वाटण्याचे काहीच कारण नाही. याउलट फक्त श्रीमती गांधींबद्दल संघाला आपुलकी वाटतेय हे मात्र खरे; परंतु हे दोन्ही घटक एकत्र येतील याची सुतराम शक्यता नाही! दलबदलू राजकारण्यांना काय शिक्षा द्यावयाची हे गांधींना चांगले माहीत आहे. तद्वतच संधीसाधु संघटनांना कितपत जवळ करावयाचे हे पण त्यांना माहीत आहे.

१७ फेब्रुवारी — प्रा. देवीदास मुळे, कोल्हापूर


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : एकेचाळीसावा
८ मार्च १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**

वार्षिक वर्गणी ।
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

# कविता – लोकशाहीसाठी

## विनय हर्डीकर

### १. भारतमाता आणि मी

वरून निळा आतून काळा खोल जनांचा सागर असा
सोज्ज्वळ सोशिक उदास मनावर परंपरांचा भयाण ठसा
विरोधी सांस्कृतिक मूल्यांचे द्वंद्व इतिहासानेच गळचात मारले
आधुनिकतेच्या मुलाम्याखाली जुनाट पीळ तसेच उरले.
संघटित जुने संख्येत संतुष्ट, गतिशील निष्ठांचे विखरून पडणे
अटळ पोकळीत बेभान झुंडींचे त्याच टोकांना अनावर धावणे.
चारित्र्याची सुबक स्तोत्रे-भ्रष्टाचाराशी अतूट नाते
विकसनाची जबर भूक-कठोर तत्त्वांची अडचण होते.
सहभागाचे पथ्य नको राज्यकर्त्यांचा चालतो ताठा.
शरणागतीच्या तिरस्काराच्या व्यक्तिपूजक वांझ लाटा
न्याय-समता-स्वातंत्र्य-क्रांती शब्दांचे अर्थ धुळीत हरवले
दहा वर्षांत तीनदा क्रांती–उत्तरांचेच प्रश्न झाले.
डोळचाला पट्टी स्वतःच बांधून ओढतात पुन्हा जुनाच घाणा
भारतमाते, तुझ्या मुलांचा उमगत नाही मला उखाणा. ¤

### २. दिल्ली–बीभत्स गारठा

सेन्ट्रल हॉलची थंड भव्यता शहरात धावणारे चावरे वारे
झिंदाबादचे (मुर्दाबादचे) आक्रोशी हुकमी सवयीचे नारे
अफाट गतीची तीन वर्षे-पाच वर्षांची अटळ शाश्वती
स्थैर्याच्या शांतीच्या आंधळचा भक्तांना हुकुमशाहीची
गोठवणारी धास्ती.

वैतागून कोण खरेच झोपले ! कुणी झोपेचे सोंगच घेतले
प्रशस्त रस्त्यांच्या निरर्थक नावात-न्यायाचे-नीतीचे
कलेवर सडले.

स्तब्ध न्यायालय, सुन्न विद्यापीठ गोंगाटात दबलेली
भविष्याची चिंता

लाल-हिरव्याचा भेद विसरलेली राजधानीतली उद्धट जनता
सलीमच्या घंटेची तुटलेली दोरी पुन्हा सांधण्याची
छाती नसताना

चांदणीचौकात तुर्कमान गेटात रिकाम्या इमारती
उंचावतात माना
इथे रामलीला-तिथे लाल किल्ला-दोघांना नाडणारी
सत्तेची वाट
त्याच वाटेवर पुसट झालेले शांतिघाट, राजघाट.
निर्णय घेण्याची धोरणी अनिच्छा देशउभारणीची
निसंगभाषा
भ्रमातच सत्य पाहणारा मतदार–परिवर्तनाची अजून
एक आशा.
¤

### ३. कानपूर–रिक्षावाले

एक म्हणाला, 'अहो साहेब, मी बुढ्ढा तुम्ही जवान
तुमचा पिक्चर बुडतोय खरा–माझ्या पायात नाही त्राण.'
दुसरा म्हणाला, 'दुप्पट भाडे पडेल, रस्ता बंद आहे
पंजा जिकल्याची विजयसभा आपली वाट रोखते आहे'
तिसरे-चौथे बोलले नाहीत नुसतेच खोकत थुंकत राहिले
उघडचा पायांनीब फाळ रस्त्यात पेडलवरती नाचत राहिले.

एक अटळ वास्तव बनून खाली बघत सामोरा आला
एक हात तुटला असून एकाने रिक्षा ओढत गेला
सुजट आंड, सपाट गाल, दाढीचे खुंट बाभुळकाटे
शोषण वणव्यात धुमसत जळणारे स्वदेशी हाडांचे
लाकूडफाटे.

भुंड्या खांद्याला बेभान नशेत त्याने पंजा जोडला काय ?
त्याच्या डोळचाला डोळा देण्याची माझी छाती
होईल काय ?

दोनाच्या जागी तीन दिले–भेकड स्वतःला खोटी शिक्षा.
(लाट रोखणाऱ्या लाल राज्यात क्रांतीचा दूतच
ओढतो रिक्षा)
¤

### ४. लखनौ : एक बूर्ज्वा संध्याकाळ

' उत्तरप्रदेशचे दास सरकार आता टिकते की कोसळते ?'
' मरू द्या ते राजकारण तुमचे-माझे काय जाते ?'
रंगसंगतीने नटलेल्या भिंती, टीव्ही प्लेअर सुंदर दिवे
मऊ कोचांच्या गाद्यात रुतले नोकरशहांचे अलिप्त थवे.
मधले दार लावून घेताच बाहेरची पीडा बाहेर राहते
आळसट घरात बाहेरच्या लक्ष्मीचे मादक नर्तन जीव रमवते.
लता-जसराज-बिस्मिल्ला-भीमसेन-स्वर्गीय सुरांचे
जखडते दोर
साहित्य-संगीतकलांचे पुच्छ पिसारा मानून नाचणारे मोर.
गचाळ गोमतीच्या अरुंद पुलावर लचाळ जीवांचा
अथक प्रवास
उत्तुंग वास्तूंची उर्मट संगत-गळ्यात अटळ दारिद्र्यफास.
झिजवट शब्द, कोमट भाव-वास्तव दूर रस्त्यात उरले
परत फिरताना (आमच्या ओझ्याने) रिक्षाचे चाक
पंक्चर झाले.

¤

### ५. पुण्यातली कुजबूज

उशीरा उठले शब्दांचे ईश्वर, तत्त्वांचे भुईनळे
जोरात उडाले
नानासाहेबही लेखकच का, म्हणूनच त्यांचे असे झाले.
गडबडे जोशी, आक्रमक ढसाळ, सौम्य पुंडलिक
परखड बोलले
हर्डीकर-थत्त्यांनी पिळले तरी लिमये-दांडेकरांनी
सावरून घेतले.
तात्त्विक बदाम सभेतच बरे, घरात खायला शेंगदाणे
नर्गिसदेखील म्हणते तर असतील गाडगीळच खरे शहाणे.
जनता पार्टी सभांना बरी, राज्य हाकायला इंदिराच हवी
क्रांतीची सुंदर स्वप्ने पाहायला स्थैर्याची गाढ निद्रा हवी.
डाव्या भटाचे पवाडे गात उजव्या भटाला जवळ केले.
आमचे सदाचे उघडे पितळ चतुराईने झाकून ठेवले.

¤

### ६. बिनधास्त मुंबई


ताई म्हणाल्या, ' प्रिय मित्रांनो, तुमचे-माझे अतूट नाते '
आम्ही म्हणालो, ' विसरा ताई, आज तुटले, काल होते. '
बोलघेवड्याला क्षमा केली, कल्याण-डोंबिवली लढून घेतली
कोकण रेल्वेची शीटदेखील इथूनच परत जोरात वाजवली.
बैलजोडीचे-गायवासराचे फारसे प्रेम कधीच नव्हते
नाइलाजाने स्वीकारले तरी संधी मिळताच टाकले होते.
विळे-हातोडे गंजून जाताच शांतपणाने खाली ठेवले
सैनिकांचे पेंढारी होताच त्यांना त्यांच्या जागी पोचवले.
लाटेवरती स्वार होताना नाकातोंडात पाणी गेले
उलटा नांगर धरणारांचे वेडे स्वप्न त्रिवार जपले.

¤

### ७. म्हैसाळ–शेवटचा मुक्काम ?

सनातनीच्या, सावकारीच्या, व्यसनाच्या गाळात
रुतलो होतो
गाईगुरांच्या पोटातले दाणे शेणातून गाळून खात होतो
गहाण पडलेली काळी शेती, संथ वाहणारी कृष्णामाई
रोजच्या दिवसाला खोल होणारी आत्मकलहाची
भीषण खाई.
एक भूमीचा सुपुत्र भेटला (' दलित मित्र ' नंतर झाला)
आमच्या हातून गळलेला नांगर त्याने परत खांद्यावर दिला.
विद्रोहाचे पेटते पाणी आम्ही रोपांच्या मुळांशी ओतले
आसवे पुसली–घाम गाळला, एकजुटीचे खत ओढले.
लाल मिरची, तांबूस द्राक्षे, भरीव ऊस, टणक मका
शुभ्र कापूस, हिरवी पाने, बहरून आले जीवन सुखा.
काळी आई प्रसन्न झाली–संघर्षाविनाच समता आली
कृष्णाकाठच्या गावागावातून आमच्या यशाची नौबत झडली.
स्वच्छ सहकार साधून दाखवू, पालटून टाकू मनू जुना
आमच्याच पावलांनी ठळक होतील संपूर्ण क्रांतीच्या
पाऊलखुणा

□



# संघाबाबत धोरण
## जुना वाद, नवी पार्श्वभूमी

वा. दा. रानडे

सत्तेवर असताना जनता पक्षात भांडणे होतीच. या भांडणामुळेच पक्षात फूट पडून सत्ता गेली. निवडणुकीत मोठा पराभव पत्करावा लागला. तरी पक्षात भांडणे व संघर्ष चालू आहेतच. त्यातून पक्षात पुन्हा दुसऱ्यांदा फूट पडणार काय अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधाचाच जुना वाद पुनः उपस्थित करण्यात आला आहे. त्यावेळी चरणसिंगांच्या भालोद गटाने जी भूमिका घेतली होती ती आता जगजीवनबाबूंनी घेतली. याबाबत प्रथम हे लक्षात घेतले पाहिजे की बाबूजींनी हा पवित्रा निवडणुकीतील पराभवानंतर घेतलेला आहे. त्यांची ही प्रथमपासून भूमिका असती तर त्यांनी चरणसिंगांबरोबरच पक्षाबाहेर पडायला हवे होते. अजूनही ते पक्षाबाहेर पडलेले नाहीत. फक्त संसदीय पक्षाचे नेतेपद त्यांनी सोडलेले नाही. पक्षावर दडपण आणून या प्रश्नावर आपल्या बाजूचा निर्णय लावून घेता येईल असे त्यांना वाटत असावे. निदान बाहेर पडण्यापूर्वी यादृष्टीने प्रयत्न तरी करावा असा त्यांचा उद्देश असल्याचे दिसते. पक्षांतर्गत लढा आपण चालू ठेवणार आहोत असे त्यांनी सांगितले जनता पक्षाच्या पराभवाचे खापर ते रा. स्व. संघाच्या धोरणावर फोडू पहात आहे व पक्ष पराभवाचे हे प्रांजळ वस्तुनिष्ठ विश्लेषण नाही. जनता सरकारचे नाकर्तेपण आणि घटकवादामुळे जनता पडलेली फूट ही जनता पक्षाच्या पराभवाची मुख्य कारणे आहेत. त्याबद्दल केवळ रा. स्व. संघाला दोष देणे जसे बरोबर नाही तसेच रा. स्व. संघाचे काही चुकले नाही असे संघसमर्थक जे प्रतिपादतात तेही बरोबर नाही. १९७७ च्या निवडणुकीत रा. स्व. संघाने जी भूमिका घेतली होती तशीच यावेळी घेतली असती तर निवडूक निकालांचे चित्र काही प्रमाणात तरी बदलले असते. १९७७ मध्ये रा. स्व. संघाने आपले सर्व बळ जनता पक्षासाठी खर्च करून हिरीरीने प्रचार केला होता. यावेळी संघ कोणत्याही पक्षासाठी प्रचार करणार नाही. संघ स्वयंसेवक व्यक्तिकरीत्या त्यांना पसंत असलेल्या उमेदवाराला मते देतील व वैयक्तिक पातळीवर प्रचार करतील अशी भूमिका सरसंघचालक बाळासाहेब देवरस यांनी जाहीर केली होती, त्यामुळे १९८० च्या निवडणुकीत जनता पक्षाच्या बाजूने रा. स्व. संघाचा सहभाग १९७७ सारखा दिसून आला नाही.

रा. स्व. संघाचे स्वरूप, रा. स्व. संघ बदलला आहे का? रा. स्व संघ व जनसंघ यांचे संबंध यावर खूप चर्चा आतापर्यंत झालेली आहे. त्याची पुनरुक्ती येथे करीत नाही. पण सध्याच्या वादाशी संबंधित काही मुद्यांचा विचार करायला हवा, सध्याच्या वादाला सुरवात झाली ती जगजीवनराम यांनी रा. स्व. संघावर केलेल्या टीकेने वगैरे. जनता पक्ष पराभवाबद्दल त्यांनी रा. स्व. संघाला दोष दिला. संघ स्वयंसेवकांनी जनता उमेदवारांविरुद्ध प्रचार केला असे त्यांचे म्हणणे होते. आम्हाला तुमचे हे आरोप मान्य नाहीत. आम्हाला संघ स्वयंसेवकांकडून चांगले सहकार्य मिळाले असे नानासाहेब गोरे यांनी कार्यकारिणीच्या बैठकीत सांगितले, पण रा. स्व. संघाविरुद्ध गंभीर आरोप जगजीवन बाबूंसारखे जबाबदार नेते जेव्हा करतात तेव्हा त्यांच्या आरोपात कितपत तथ्य आहे याचा शोध घेण्यासाठी व यादृष्टीने काही मतदार संघातील पराभवाची पाहणी करण्यासाठी कार्यकारिणीने एक समिती नेमायला हवी होती. जगजीवनबाबूंनी आपल्या गटाची बैठक घेतली. या बैठकीत बहुसंख्य कार्यकर्त्यांनी जनता पक्षाबाहेर पडावे असे मत व्यक्त केले पण याबाबत अंतिम निर्णयाचे अधिकार जगजीवनबाबूंवरच सोपविले. त्यांच्यापुढे तीन पर्याय होते १. वेगळा पक्ष काढणे, २. लोकशाहीवादी काँग्रेस पक्ष पुन्हा स्थापन करणे, ३. जनता पक्षातून रा. स्व. संघाच्या समर्थकांना काढून टाकून त्याचे शुद्धीकरण करणे. यापैकी तिसरा पर्याय बाबूजींनीसुद्धा स्वीकारला असल्याचे दिसते.

आपली हिंदुत्ववादाची प्रणाली सोडून खरोखर धर्मनिरपेक्ष राष्ट्रवादाची भूमिका रा.स्व. संघाने स्वीकारली आहे का याबद्दल तर संघ विरोधकांच्या मनात शंका आहेतच पण त्यांना विशेष आक्षेपार्ह वाटलेले इंदिरा काँग्रेसबाबतचे संघाचे धोरण सर संघ चालक देवरस यांनी निवडणुकीनंतरच्या एका निवेदनात इंदिरा गांधींच्या सरकारशी सहकार्याची तयारी दर्शविली. रा. स्व. संघ आणि इंदिरा काँग्रेस यांच्यात सहकार्याचा गुप्त करार झाला असल्याचा आरोप गुजरातचे माजी मुख्य मंत्री बाबूभाई पटेल यांनी केला. त्यांचा उल्लेख जगजीवनराम यांनी आपल्या निवेदनात केला आहे हा करार निवडणुकीपूर्वीच झाला असल्याचे पटेल यांनी सूचित केले आहे. अशा गंभीर आरोपात कितपत तथ्य आहे याची पाहणी करायला हवी; पण केंद्रीय नेत्यांची त्याला तयारी दिसत नाही.

रा. स्व. संघाचे इंदिरा गांधी आणि इंदिरा काँग्रेस यांच्या संबंधात धोरण बदलले असेल तर जनता पक्षाला रा. स्व. संघाशी संबंधच नव्याने विचार करायलाच हवा. हा केवळ जुना वाद नसून त्याला ही नवी पार्श्वभूमी आहे. जनता पक्षातील फुटीनंतर आता जनता पक्ष सत्तेवर येण्याची शक्यता नाही हे दिसून येऊ लागल्यापासूनच रा. स्व. संघाच्या धोरणात बदल झाला असण्याची शक्यता आहे. जनता पक्ष आपल्या नियंत्रणाखाली आणणे शक्य नसेल तर त्यातून बाहेर पडून जनसंघ पुनः स्थापन करावा असे काही रा. स्व. संघ कार्यकर्त्यांना वाटत असणेही अशक्य नाही. १९७७ च्या निवडणुकीत जनता पक्षात सामील होऊन जनसंघ गटाने घटक पक्षात सर्वांत जास्त ९० जागा मिळविल्या होत्या. यावेळी जनता पक्षाला मिळालेल्या ३१ जागात १६ माजी जनसंघीय आहेत. यापूर्वी एकट्याच्या बळावर जनसंघाने सर्वात जास्त ३५ जागा १९६७ च्या निवडणुकीत जिंकल्या होत्या. १९७१ च्या पहिल्या इंदिरा लाटेत त्याचे बळ २२ पर्यंत घटले व आता दुसऱ्या इंदिरा लाटेत ते १६ पर्यंत खाली आले. जनता पक्ष आपल्या नियंत्रणाखाली येत असेल तरच त्यात रहावे नाहीतर बाहेर पडावे असा विचार संघ कार्यकर्त्यात बळावण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लोकशाहीवादी शक्तींनी एकत्र येण्याची आवश्यकता असता उलट जनता पक्षात दुसऱ्यांदा फूट पडण्याची चिन्हे दिसत आहेत पण एकजूट टिकविण्यासाठी तत्त्वांचा बळी द्यावयाचा का याचाही विचार करायला हवा. तत्त्वे आणि एकजूट यांची योग्य सांगड घालायला हवी. एकांगी भूमिकेने फूट टाळता येणार नाही. जनता पक्षाचे सभासद पक्षाचे धोरण व कार्यक्रम निष्ठेने अनुसरतात की नाही, पक्षाबाहेरच्या केंद्राने दिलेल्या आदेशानुसार वागतात हीच एक कसोटी हा वादप्रश्न सोडविताना लावायला हवी. ☐

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# उद्योगी मोठी

**उठुनि सकाळी ती मधमाशी ।।**
**जाते की मध मिळवायासी ।।**
**थेंबे थेंबे साठवि त्यासी ।।**
**उद्योगी मोठी ।।**

पुण्यातील टिळकस्मारक मंदिरात दि. २५, २६, २७ या दिवशी 'सेंट्रल बी रिसर्च इन्स्टिटयूट' डे. जि. पुणे या संस्थेतर्फे, मधमाशा संशोधन संस्थेचे कार्य, संशोधन व प्रशिक्षण यासंबंधी प्रदर्शन होते व दि. २७-२-८० या दिवशी सकाळी 'उष्णकटिबंधातील मधुमक्षिका पालन' या विषयावरील दिल्लीला होणाऱ्या दुसऱ्या आंतरराष्ट्रीय परिषदेनिमित्त, परिषदपूर्व परिसंवाद होता. या परिसंवादाचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. सादिक अली यांच्या हस्ते होते. अध्यक्षपदी खादी ग्रामोद्योग कमिशनचे श्री. सोमदत्त होते व निमंत्रक होते डॉ. देवडीकर व शिरूभाऊ लिमये.

वरील मधुमक्षिका पालनाच्या प्रदर्शनात हॉलच्या मध्यावर प्रारंभी दिलेली कविता फलकावर ठळक अक्षरात लिहून ठेवली होती. कवितेच्या पुढच्या पंक्ती वाचता वाचता माझे अंग आनंदाने शहारून आले. साध्याभोळया शब्दातून थोर आशय सांगणारी ही कविता, मी साध्याभोळया बालपणी पाठ केली होती. तिचा परिणाम आमच्या पिढीवर झाल्यामुळे आमच्या पिढीने अनंत उद्योग केले. त्याचे प्रत्यंतर आपणास आज दिसतेच आहे.

ही कविता गुणगुणतच मी मधमाशा पाळण्याबद्दलचे हे प्रदर्शन पाहिले. प्रदर्शनात पाच-सहा दालने होती. पहिल्या दालनात मधमाशा, मध, मधाची पोवळी यासंबंधी प्राचीन उल्लेख होते. दुसरे दालन मधुमक्षिका ज्या वनस्पतीतून मध शोषतात त्या वनस्पतीचे. तिसरे दालन मधमाशांमुळे जी पिके वाढतात त्या पिकांचे होते. चौथे दालन मधमाशा पाळण्यासाठी वापरात आणावयाच्या लाकडी पेटयांचे होते. पाचवे दालन मधमाशा व फुलपाखरे यांचे अनेक नमुने यांचे होते. सहाव्या दालनात मधुमक्षिका पालनासंबंधी वाङमय ठेवले होते.

प्रदर्शन उत्तमच होते. फक्त त्यामधील मधमाशी किंवा पोवळे माझ्या ओळखीची नव्हती. माझ्या ओळखीचे पोवळे उंच झाडावरचे होते. एखाद्या माकडाच्या पिलासारखे ते टांगलेले असे. झाडाखाली मुले खेळत असत, त्यातला एक खोडसाळ मुलगा (तो मीही असेन) मुलांचं लक्ष नाही असं पाहून एक दगड पोवळयावर हाणी आणि पळत सुटे. ससा किंवा हरीण किंवा चित्ता पळत नसेल अशा वेगाने पळत सुटे.

प्रदर्शन पाहत असता एका माहीतगाराने आम्हाला हेच सांगितले होते. मधमाशी चावली की, पळत सुटा आणि पळता पळता गवत किंवा पाला खुडून दंश झालेल्या जागी चोळत जा. कारण दंश झालेल्या जागी मधमाशी जो विषाचा थेंब सोडते त्याचा वास इतर मधमाशांना येतो व त्या तुमच्याकडे गर्दी करतात; पण पाने किंवा गवत चोळल्याने तो वास मरतो व इतर मधमाशा तुमच्या मागे येत नाहीत.

¤

मधुमक्षिका पालनावरील या परिषदपूर्व परिसंवादाचा आरंभ दि. २७-२-८० ला वेद आणि उपनिषदांतील मधुविषयक ऋचा व मंत्र यांनी झाला. पं. वसंतराव गाडगीळ व त्यांचे शिष्य यांनी ते म्हटले. पहिली ऋचा होती—

त्रयः पवयो मधुवाहने रथे सोमस्य
वेनामनु विश्व इद विदुः ।
त्रयः स्कम्भासः स्कभितास आरभे ।
त्रिर्नक्तं याथस्त्रिर्वाश्विना दिवा ।।

एक ऋचा अशी होती—

अन्नं वै मधु । सर्वं वै मधु । सर्वे वै कामा मधु । मधु वै देवानाम परममन्नाद्यम् ।

परिसंवादाच्या स्वागत समितीचे अध्यक्ष श्री. शिरूभाऊ लिमये सर्वांचे स्वागत करून म्हणाले,

'दिल्लीत भरणाऱ्या परिषदेची ही सुरुवात आहे. या परिसंवादास आम्हाला लोकमान्य टिळकांचे स्मारक असलेली ही जागा अगदी थोडक्यात मिळाली या दृल आम्ही आभारी आहोत.

'गांधीजींनी ग्रामोद्योगांकडे सर्वांचे लक्ष वेधले. त्यानंतर १९५२ साली बापूसाहेब शेंडे यांनी मधुमक्षिका पालनाच्या उद्योगास आरंभ केला. १९६० साली सेंटर निघाले तेव्हा मधुमक्षिका पाळण्याचे ठरविले. महात्मा गांधी महाराष्ट्राला कार्यकर्त्यांचे मोहोळ म्हणत. ती उपमा मधमाशा पाळण्याचे बाबतीत खरी ठरली.'

डॉ. इव्हा क्रेन या वृद्ध कार्यकर्त्या नंतर बोलल्या. त्या म्हणाल्या, 'या ॲपिकल्चर रिसर्च इंटरनॅशनल सेंटरचे १०५ देशात सभासद आहेत. पंचावन्नसाली सेंटरची पहिली कॉन्फरन्स इंग्लंडमध्ये भरली. तेव्हाच ठरले की दुसरी कॉन्फरन्स भारतात घ्यावी. भारत सरकारने आम्हाला निमंत्रण दिले. कॉन्फरन्स लहान गावी न ठरविता दिल्लीत का घेतली असे कुणी विचारील. तर सेंट्रलला हलवावयाचे असेल तर दिल्लीतच हालचाल हवी.

इथे येण्यास आम्हाला कॅनडाने पैसे पुरविले. प्रदर्शनात आम्हाला सर्व वाङमय ठेवता आले नाही.'

नंतर त्यांनी टेनिसनची एक कविता म्हणून दाखवला. नंतर मेंबर सेक्रेटरी व्ही. रामचंद्रन म्हणाले, 'डोंगरावरचे यत्न मैदानात आणण्यासाठी आमचे यत्न राहतील.' खादी व ग्रामोद्योग कमिशनचे अध्यक्ष श्री. सोमदत्त म्हणाले, 'नेक्टर वाया जातं. कारण मधमाशा नाहीत.'

¤

समारंभाचे उद्‌घाटन महाराष्ट्राच्या राज्यपालांचे हस्ते होते. मंत्रिमंडळ बरखास्त झाल्याने आता मान्यवर राज्यपाल महाराष्ट्राचे शास्ते होते. मी त्यांना पंधरा ऑगस्टला त्यांच्या बंगल्यावरील खान्याच्या वेळी पाहिले. आता नव्या अधिकारात ते काही वेगळे दिसतात का पहात होतो. त्या वेळेप्रमाणेच लांब कोट व डोक्यावर गांधी टोपी होती. मा. राज्यपाल म्हणाले,

'परिसंवादाला येता का म्हणून विचारले. मी आलो. मी आतापर्यंत मध खात आलो होतो. पण मधाबद्दल मला काही माहिती नव्हती. आठ दिवसांपूर्वी येथे राष्ट्राध्यक्षांची राजवट आली आणि माझ्या जबाबदाऱ्या वाढल्या. आधीच्या ठरलेल्या पुढच्या कार्यक्रमांच्या सर्व तारखा रद्द केल्या; पण या परिसंवादासाठी बाहेरच्या देशातील मंडळी आलेली असल्याने हा कार्यक्रम रद्द केला नाही.'

अखिल भारतीय मधुमक्षिका पालकसंघाचे बापुराव शेंडे यांचे भाषण झाले. ते म्हणाले, 'आता शासनाची जबाबदारी राज्यपालांवर पडली असली तरी वेळात वेळ काढून ते आवर्जून आले याबद्दल आभारी आहोत. आपले राज्यपाल आम्हाला राज्यपालांहून जास्त आहेत. ते गांधीवादी वृत्तीचे आहेत. टिळक स्मारक मंडळाचे हे रंगमंदिर आम्हाला अल्प भाड्याने मंदिराच्या व्यवस्थापकांनी दिले त्याबद्दल आभार—'

¤

वरील प्रसंगीच्या भाषणातून दोन तीन वेळा टिळक स्मारक मंदिर कमी भाड्याने मिळाल्याबद्दल आभार मानले गेले त्याची गम्मत वाटली. या नव्यानं बांधलेल्या भव्य टिळक स्मारक मंदिराच्या वास्तुच्या उभारणी मागील प्रमुख व्यक्ती म्हणजे केसरीचे संपादक श्री. जयंतराव टिळक. जयंतरावांनी आपला केसरी काँग्रेसला अनुकूल केल्यापासून बऱ्याच लोकांना ते अप्रिय झाले होते. पुष्कळ खाजगी संभाषणात त्याबद्दल त्यांचा संतापाने धिःकार केला जाई. जयंतरावांवर राग असलेल्या या लोकांना लो. टिळक यांच्या नावावर रंगमंदिर उभारणेही आवडले नव्हते.

रंगमंदिराबद्दलचा या लोकांचा राग मला कधी कळला नाही. विटा पडत चाललेले पहिले रंगमंदिर चांगले होते का? टिळकपथावरील खाजगी घरेसुद्धा पाडून त्या जागी पाच सहा मजली इमारती घरमालक उठवीत आहेत. टिळकांचे स्मारक मोठे झाले तर बिघडले कुठे? आणि तिथे अनेक सांस्कृतिक हालचाली झाल्या तर बिघडले कुठे? बिघडले नाही हे या एकाच प्रसंगी मानल्या गेलेल्या आभारांवरून कळते. माझ्यामते प्रत्येक गोष्टीत राजकारण घुसडण्याची आपणास लागलेली सवय आपली हानी करीत आहेत. त्यामुळे राजकारण बिघडतेच, सांस्कृतिक कारणही बिघडते.

¤

टिळक स्मारक मंदिराबद्दल पुन्हा प्रसंग येईल तेव्हा विस्ताराने सांगेन. तेथे भरलेले 'मधुभक्षिका पालन' प्रदर्शन आम्ही अगदी संध्याकाळी पहावयास गेलो. जरा घाईच झाली. पण सर्व पाहून झाल्यावर पुन्हा दुसरे दिवशी सकाळी पाहिले. त्या वेळेस एक जाणता अधिकारी आम्हास भेटला व त्याने खूपच माहिती दिली. मधमाशीने डंख करिताच धूम पळावे हे त्यानेच सांगितले. मी त्यांना विचारले की, मधमाशी डंख करताच मरते हे काय? तो म्हणाला, 'ते खरे आहे. तिने डंख करताच ज्यामुळे तिला दिशा कळते तोच वासाचा भाग, ती चावते त्या शरीरात, तुटून राहतो. मग ती सैराभैरा उडत राहते व शेवटी थकून पडते.' तो गृहस्थ आणखी म्हणाला,

'खोडी काढली नाही तर कोणतीच मधमाशी चावत नाही. मधमाशा पाळणाऱ्यांना त्या दृष्टीने सावध रहावे लागते.'

असे म्हणून त्याने प्रदर्शनातील मधुमाक्षिका पालनाच्या एका पेटीशी जाऊन वरचे झाकण काढून आतील मधमाशांचा पोवळे बांधण्यासाठी केलेली चौकट बाहेर काढली. ते म्हणाले, 'पोवळे पुरे पिकले का पहाण्यास ही चौकट काढताना संथ लयीत वळवली की मधमाशा हलतसुद्धा नाहीत. रानातील फांदीवर टांगलेले मोहोळ वारंवार डिवचले जाते. पक्षी येतात. मुले दगड मारतात. कधी झाडाची वाळकी फांदी पडते. असे वारंवार डवचले गेल्याने अशा मोहोळातल्या माशा संतापी होतात. मूळ सगळ्या मधमाशा सारख्याच.'

आपल्या देशात दक्षिणेकडून उत्तरेकडे जावे तसा मधमाशांचा आकार वाढत जातो. म्हणून वेगळ्या आकारात मोहोळाच्या पेट्या केल्या आहेत. त्या सबसिडीने मधुपालनास दिल्या जातात. बिहारचे मोहोळ प्रतिवर्षी दहा ते बारा किलोग्राम मध, महाराष्ट्राचे मोहोळ पाच ते सहा कि. ग्रॅ. मध देते एका मोहोळात एक राणी व शेकडो कामगार माशा असतात. कामगार मधमाशा सर्व माद्या असतात. राणी दर चोवीस तासाला चारशे अंडी घालते. सतत दोन वर्षे ती हे करते.

आज मधमाशा पालनांच्या ५ लक्ष ७ हजार पेट्या भारतात आहेत. या पाळीव मोहोळातून दरसाल तीन कोटी रुपयाचे मधाचे उत्पादन होते. एक लक्ष सत्तर हजार ग्रामीण कुटुंबे मधमाशा पाळून कमाई करीत आहेत. पण मधाच्या किंमतीहून दसपट फायदा मधुमक्षिका पालनाने पिकांना होतो. जिथे मोहोळ आहेत त्याभोवतालची पिके वाढण्याने हा फायदा होतो असे सिद्ध झाले आहे. तेलबिया, कडधान्ये, फळ भाज्या, हरतऱ्हेची फळे, मसाल्याच्या पदार्थांची पिके, धान्याची पिके वगैरेचे उत्पन्न, मधमाशांची पोळी जवळ वाढवल्याने वाढते असा अनुभव आहे.

मधुमाक्षिका पालन हे आता शास्त्रच झाले आहे. शिरूभाऊ लिमये म्हणाले, "मधमाशा मध स्वतःसाठी तयार करतात व आपण तो लुबाडीत असतो हे खरे असले तरी आता शास्त्रीय पद्धतीने चाललेल्या मधुउत्पादनात, मधमाश्यांना उपाशी न ठेवता, न हाकलता किंवा न मारता, पोवळ्यास धक्का न लावता मध काढला जातो. पूर्वी मध काढावयाचा म्हणजे पोवळ्याखाली जाळ करण्याची पद्धत होती. तो क्रूरपणा आता नक्की नाही आणि पोवळी पिळून मध

काढीत. आता तो प्रकारही नाही. "

ज्यांना मधुमाक्षिका पालनासंबंधी विशेष माहिती हवी असेल त्यांना मुद्दाम खाली दोन पत्ते दिले आहेत–

(१) प्रचार संचलनालय, खादी ग्रामोद्योग आयोग, ग्रामोदय,
३ इर्लारोड, मुंबई ५६.

(२) सेंट्रल बी रिसर्च इन्स्टिटयूट,
खादी आणि ग्रामोद्योग कमिशन
C ३९/१ डेक्कन जिमखाना,
पुणे ४.

¤

मधुमाक्षिका पालनापासूनचे हे फायदे सांगितले. पण याहून आणखी वेगळा दृष्टिकोन 'अग्निहोत्र व मधमाशी' या कॅरोल वाटरमन (नेदरलँडस्)व बेरी रॅथनर (अमेरिका) या दोघांनी कॉन्फरन्ससाठी लिहिलेल्या निबंधात आहे. त्यांचे मुद्दे असे की– १ : सभोवताल बदलत आहे. मधमाश्यांचे बीजीकरणाचे काम त्यामुळे खंडीत होत आहे. त्याचा परिणाम वनस्पतींवर होत आहे. २ : नर मधमाशी मादी होऊ लागली की, जी हार्मन्स बाहेर पडतात ती अत्यंत औषधी असतात पण अग्निहोत्राच्या अभावी ते काम त्या माशा करीत नाहीत. यज्ञामुळे हा बदल त्यांच्यात होत असतो. ३ : निसर्ग हिरवा व फलता फुलता ठेवण्यास मधमाशा हाच एक उपाय आहे. ४ : अत्यंत शास्त्रीय पद्धतीने मधमाशा पाळणारेसुद्धा मधमाशांना आनंदात राखण्याचे महत्व जाणत नाहीत. यज्ञामुळे–अग्निहोत्राने–त्या आनंदी राहतात. ५ : जर मधमाशांचे रक्षण केले नाही तर जसे पक्षी नामशेष झाले, मासे गेले तशा मधमाशाही नष्ट होतील. त्यासाठी तरी जगातील सर्व लोकांनी अग्निहोत्र करावे. ६ : अग्निहोत्र करायला दिवसाची काही मिनिटेच द्यावी लागतात. त्याचा परिणाम कातडी, फुफ्फुसे व मन यावर होतो. अग्निहोत्रानं मधमाशांना आनंदित ठेवल्याने मधमाशा वाचतील पण त्याशिवाय पृथ्वीवरील माणसाचे जीवनही वाढेल.

ज्यांना अग्निहोत्राची माहिती हवी असेल त्यांच्यासाठी निबंधाच्या शेवटी तीन पत्ते दिले आहेत. त्यांतले दोन परदेशातले व एक भारतातला आहे. आता अग्निहोत्र म्हणजे काय हे आम्ही त्यांना विचारण्याची वेळ आली आहे हे खोटे नाही.

मधुमक्षिका पालनासंबंधी प्रदर्शनात ज्या अधिकाऱ्यानं आम्हाला माहिती दिली त्याने एक इषारा दिलेला सांगतो. ते म्हणाले, "चाळीशीच्या पुढे मधुमाक्षिका पालन सुरू करू नये. कारण मधमाशीचे विष हे नागाच्या विषाएवढे धोकादायक असते. पुढच्या वयात एका मधमाशीचा दंशही घातक ठरतो. त्यासाठी तरूण वयात मधुमक्षिका पालन घ्यावे म्हणजे त्या विषाची सवय होऊन पुढच्या वयात त्रास होत नाही."

¤

सरकारी पत्रके रुक्ष, कठोर, तुटक असतात असा नेहमीचा नियम. हल्ली त्याला अपवाद दिसू लागले आहेत. मधुमाक्षिका पालनाच्या एका सरकारी पत्रकाचे शीर्षक 'मधमाशा संगोपन–एक उत्पादक उद्योग' असे आहे व आरंभ असा आहे–

'पाळीव मोहोळात मधमाशा करतात तरी काय ? फुलाफुलातून कणाकणाने मकरंद घेऊन येऊन घरट्याभोवती रुंजी घालतात. बालक्रीडांगणांतील उत्स्फूर्त हास्यकल्लोळ दुरून कानी यावा तसा मोहोळाभोवती मधमाशांचा गुंजारव चालतो. ऋग्वेद कालापासून भारतीय परंपरा मधाशी निगडीत आहे.'

या प्रदर्शनातही मधाशी प्राचीनता दाखवणारी चित्रे होती. त्यातले एक भिमबेटका येथील खडकावरचे आहे. ते तेरा हजार वर्षांचे जुने आहे. त्याला माकडे, माणसे व मोहोळ असे शीर्षक आहे. या चित्रातली गती, सहजता व काही थोडचा रेषातून उभा केलेला अर्थ हे सर्व पहातच रहावेसे वाटते. दुसरे चित्र असेच ९००० वर्षांपूर्वीचे पंचमठी येथील. चित्रात एक जण मधुपान करीत आहे. त्यातील माणसाने ज्या तऱ्हेने आ केला आहे, मधुपात्र तोंडावर धरले आहे व पाय पसरले आहेत त्यात त्याला वाटणारा आनंद ओसंडून जाताना दिसतो. तिसरे चित्र मधमाशीवर बसून चाललेल्या कामदेवाचे आहे. ही तीन चित्रे पहायलाच हवीत. पुन्हा हे प्रदर्शन भरले तर न पाहिलेल्यांनी ते आवर्जून पहावे. तसेच आपल्या घराच्या आवारात एखादी मधमाशीची पोवळचाची पेटी ठेवावी. त्यामुळे त्यांना मध मिळेलच; पण त्यांची बाग उत्तम फुलेल. फळेही वाढतील. ☐


## तीन राजहंस प्रकाशने

### आणि ड्रॅगन जागा झाला
लेखक : अरुण साधू । मूल्य : चवदा रुपये

### मॅक्झिम गॉर्की
लेखिका : सुमती देवस्थळे । मूल्य : दहा रुपये

### पूर्णिया
लेखक : अनिल अवचट । मूल्य : सहा रुपये

मुंबई वार्ता

# हीरक महोत्सवी नाट्यसंमेलन

विनया खडपेकर

गेले काही दिवस गाजत असलेले, मराठी नाट्य व्यावसायिक निर्माता संघाने आयोजित केलेले, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे हीरक महोत्सवी संमेलन दि. २३, २४, व २५ फेब्रुवारी या दिवशी रूपारेल कॉलेजच्या प्रांगणात थाटामाटाने, धुमधडाक्यात साजरे झाले.

पुण्याच्या श्री. राहतेकरांनी उभारलेला सभाभंडप शोभिवंत होता. सुमारे पाच हजार प्रेक्षकांची सोय असलेल्या या सभामंडपाला डॉ. प्र. ना. भालेराव सभामंडप असे नाव दिले होते. या सभामंडपाला अनेक प्रवेशद्वारे होती. मंडपाच्या बाहेरील बाजूस नाटककार आणि कलावंतांच्या भव्य तसबिरी लावल्या होत्या.

शनिवार दि. २३ फेब्रुवारी संध्याकाळचे सहा वाजता कार्यक्रमास सुरुवात झाली. नटवर्य केशवराव दाते रंगमंच सुंदर फुलांनी सजवला होता. नक्षीदार खांब फुलांनी सजवले होते. शाहीर साबळे यांच्या महाराष्ट्रगीताने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. त्यानंतर संमेलनाचे अध्यक्ष श्री. छोटा गंधर्व यांनी नटराजपूजन केले. पूजाविधीचे ध्वनिमुद्रित संस्कृत कथन अगदी सुस्पष्ट आणि सुश्राव्य होते. नटराज पूजनानंतर अ. भा. नाट्य–परिषदेचे कार्याध्यक्ष श्री. पांडुरंगराव शिरोडकर यांनी प्रास्ताविक भाषण केले. नंतर संमेलन समितीचे अध्यक्ष श्री. बा. म. गोगटे उभे राहिले. ते म्हणाले, 'हे वर्ष संमेलनाचे हीरक महोत्सवी वर्ष आहे. नाट्यपरिषदेचे अमृतमहोत्सवी वर्ष आहे व संगीत रंगभूमीचे शताब्दी वर्ष आहे. असा हा तिहेरी महत्त्वाचा उत्सव या मुंबईनगरीत होतो आहे. मी एक नाट्यरसिक आहे. संगीत रंगभूमीचा वैभवकाल मी पाहिला आहे. आता तो ओसरतो आहे. यासंबंधी विचार झाला पाहिजे. भरीव योजना आखल्या पाहिजेत. संगीत रंगभूमी पुन्हा सुप्रतिष्ठित व्हावी अशी नटराजाच्या चरणी प्रार्थना !'

नंतर निर्माता संघाचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब सप्रे म्हणाले, 'हे महत्त्वाचे संमेलन भरविण्याचा मान आमच्या निर्माता संघाला मिळाला. निर्माता संघाचे एकंदर पंचेचाळीस सदस्य आहेत. अखिलाडू स्पर्धेला आम्ही आळा घालतो. दरवाढ, कलाकारांसाठी जागा, सामानांसाठी गोडाउन्स हे आम्हाला भेडसावणारे प्रश्न आहेत.'

उद्योगपती श्री. लालचंद हिराचंद म्हणाले, 'आजचा हा कार्यक्रम अपूर्व योगायोग आहे. या कार्यक्रमाला छोटा गंधर्वांसारखा अध्यक्ष, पु. लं. सारखा स्वागताध्यक्ष मिळाला हे आमचे सद्भाग्यच ! महाराष्ट्राने कलावंतांची दीर्घ परंपरा जोपासली आहे. शंभर वर्षांपूर्वीची नाटके आम्ही आजही उपभोगतो. किर्लोस्करांची नाटके आजही ताजी वाटतात. नाटककार खाडिलकर, गडकरी यांचेही आम्ही ऋणी आहोत. स्वप्नाळूपणामुळे युवापिढीवर होणारा प्रतिकूल परिणाम लक्षात घेता, नाटकांमधून अशा कथानकांचे पूर्ण उच्चाटन करणे व नाटकांकडे समाज-शिक्षणाचे माध्यम या दृष्टिकोनातून पहाणे आवश्यक आहे.' यानंतर श्री. मदन मोहन लोहिया यांनी दोन्ही प्रदर्शनांची (भरत नाट्यमंदिर आणि श्री. के. टी. देशमुख यांनी योजलेली) माहिती सांगितली व ती खुली झाल्याचे जाहीर केले. स्वागताध्यक्ष श्री. पु. ल. देशपांडे यांनी आपल्या भाषणात, स्नेहसंमेलनात होणारी विचारांची देवघेव, कलेचे–नाट्यकलेचे स्वरूप प्रेरणा, संगीत रंगभूमीचे गुणदोष यासंबंधीचे विचार सांगितले. अर्थात नेहमीच्या चुरचुरीत शैलीत ! त्यामुळे त्यांचे जराही ओझे झाले नाही. हसतखेळत विषय रंगविला होता.

श्री. भालबा केळकर यांनी अध्यक्षीय सूत्रे श्री. छोटा गंधर्व यांना दिली या नंतरच्या सत्कारप्रसंगी शिल्पकार श्री. सहस्रबुद्धे यांनी श्री. छोटागंधर्व यांना त्यांचा अर्धपुतळा अर्पण केला.

हा औपचारिक समारंभ झाल्यावर बोलायला उभे राहिले श्री. भालबा केळकर. '१९३० साली बालगंधर्वांच्या अध्यक्षतेखाली नाट्यसंमेलन झालं होतं. पन्नास वर्षांनी दुसरा गंधर्व अध्यक्ष लाभला आहे. केवळ नावाने 'छोटा' पण मनाने मोठा ! त्यांची गाणी म्हणताना कठीण ! 'नच सुंदरी' रस्त्यात म्हणावे तर घरात कोप व्हायचा ! रात्री उशीरा घरी आले की, 'प्रिये पहा' कोणाला म्हणायचे हा प्रश्नच ! दादांचा धैर्यधर विसरता येणार नाही. दादांच्या रूपाने संगीत रंगभूमीला पन्नास वर्षांनी गोड सूर मिळाला. संगीत रंगभूमीला आता नव्याने भरती येणार. एक वर्ष कामाला कमी आहे. मला चौदा महिने मिळाले. मी प्राध्यापक आहे. तो व्याप सांभाळून, थोडी दगदग सहन करून सगळीकडे गेलो. आंतरप्रांतीय संपर्काचा प्रकल्प उभा केला. शिबिरे, मेळावे घेतले. नाट्यपरिषदेच्या कामात मी अजूनही गुरफटणार याची मी ग्वाही देतो. माझ्या मानधनाच्या सातशे रुपयांपैकी चारशे रुपये नाट्यपरिषदेला देतो आणि तीनशे रुपये नाट्यपरिषद, पुणे शाखेला देतो. ही नम्र देणगी !'

श्री. छोटा गंधर्व म्हणाले, 'आज मी वक्त्याची नीरस भूमिका आपल्यापुढे करीत आहे याचे दुःख होते; पण आजचा दिवस माझ्या आनंदाचाही कळस आहे. एक संतवचन आहे. 'आधी कळस मग पाया; पण माझे जीवन मात्र व्यावहारिक दिशेने 'आधी पाया आणि मग कळस' असेच आहे. (हा आपल्या प्रेमाचा चमत्कार) माझ्या लेखी प्रतीचे वाचन मी करीत नाही. भाषण छोटे आहे. अलंकार घातले असते तर मोठे झाले असते; पण मला अलंकारांनी सजलेले 'लक्ष्मीधर' करावयाचे नव्हते तर अलंकारहीन 'चारुदत्त'च ठेवायचे होते. उपेक्षित कलावंतांचे भले करण्यासाठी मी अध्यक्षपद स्वीकारले. इतर अनेक प्रश्न आहेत ते

### हजारो मैलांचा प्रवास, मुलाखती, चर्चा, गाठीभेटी यांवर आधारित 'माणूस प्रतिनिधी' सादर करीत असलेली नवी लेखमाला

# अस्वस्थ आसाम

**लेखांक पहिला** **विनय सहस्रबुद्धे**

अवघा आसाम आज अस्वस्थ आहे. गेले सहा महिने असमिया नागरिक आपल्या अस्तित्वासाठी झगडत आहे. कधी नव्हे एवढी असमियांची अस्मिता आज जागृत झाली आहे.

गेल्या एप्रिल १९७९ मध्ये एका पोटनिवडणुकीच्या निमित्ताने मतदार याद्यांमध्ये हजारो विदेशी नागरिकांची नावे घुसविण्यात आल्याची बाब लक्षात आल्यानंतर विदेशी नागरिकांना भारतातून हुसकावून लावण्यासाठी सुरू झालेले हे आंदोलन आज अधिक व्यापक झालं आहे. आपल्याच प्रदेशात अल्पसंख्यांक बनण्याची शक्यता असलेला असमिया समाज विलक्षण जिद्दीनं पेटून उठला आहे. गेली अनेक वर्षे दुर्लक्षित राहिलेला हा समाज संघटित लोकशक्तीच्या रूपात आज समर्थपणे उभा आहे, आपल्या अस्तित्वालाच आव्हान देऊ पाहणाऱ्या विदेशी नागरिकांविरुद्ध आसाम आज पेटून उठला आहे.

शालांत परीक्षेनंतर भूगोलाचं पुस्तक मिटवून ठेवतानाच आसामविषयीचं कुतूहलही मिटवून ठेवणाऱ्या, आसामपासून हजारो मैल दूर राहणाऱ्या तुम्हा–आम्हा सामान्यांना आसामातील या जनआंदोलनाचं आगळेपण कदाचित लक्षात येणार नाही. त्यामुळेच अशा प्रकारचं आंदोलन आसामात नेमकं आताच का उभं राहिलं ? या आंदोलनाची उद्दिष्टे बंगाल्यांविरुद्धही आहेत की काय ? सतत सहा महिने सर्व अडचणींवर मात करून, संघटितपणे आणि चिकाटीने हे आंदोलन चालविण्याची ताकद साध्या-भोळ्या असमिया नागरिकात आली तरी कुठून ? आणि परकीय नागरिकांच्या घुसखोरीची समस्या जर बरीच जुनी आहे तर याआधीच हे आंदोलन का झालं नाही ? हे आणि असे अनेक प्रश्न स्वाभाविकच आपल्या मनात घर करतील, नव्हे तसं ते करतातच. या आणि अशाच प्रश्नांचा शोध घेण्यासाठी मी आसामला जायचं ठरवलं.

¤

खुष्कीच्या मार्गानं मुंबईहून आसामला जायचं म्हणजे किमान तीन दिवस जवळजवळ सतत प्रवासात घालवायला हवेत. वेळ वाचवायचा होता, त्यामुळे कलकत्ता ते गौहाती विमानाने गेलो.

कलकत्ता–गौहाती हे विमानाने जेमतेम पन्नास मिनिटांचं अंतर आहे. प्रवास छोटासाच असला तरी निसर्गरम्य प्रदेशावरून विमान जात असल्याने त्याचा एक वेगळाच आनंद आहे. विशेषत: प्रवास म्हटला की नेहमी धुरांच्या रेषा हवेत ओढणारी, आगगाडी आणि पळती झाडे एवढंच फक्त आठविणाऱ्या माझ्यासारख्याला तर तो फारच आल्हाददायक वाटला. पांढरेशुभ्र, विशविशीत ढग आमच्य सोबतीला होते आणि आमचं विमान ऐन बांगला देशाच्या भूमीवरून गौहातीकडे जात होतं. सबंध प्रवासात जेव्हा खाली पहावं तेव्हा जमिनीचा उंचसखलपणा दर्शविणारे भूगोलाचे लांबलचक नकाशे अंथरून ठेवल्यासारखं वाटत होतं. विमान गौहातीच्या जवळ येऊ लागलं तसतसा डोंगराळ भाग दिसू लागला. वनश्रीनं नटलेल्या आणि छोटया-मोठ्या टेकड्यांनी वेढलेल्या जुन्या प्राग्ज्योतिषपुराचा, म्हणजेच आत्ताच्या गौहातीचा विमानतळ खूपच छोटा आहे. विमानतळावरच्या अनेक इमारतींचं बांधकाम अद्याप अपूर्णावस्थेत आहे. त्यामुळे सर्वसाधारण विमानतळांवर आढळणारा रुबाब इथे दिसत नाही. फार काय, पण गौहातीचं रेल्वेस्टेशन सुद्धा विमानतळापेक्षा अधिक शानदार आहे.

¤

आसाम हा तुम्हा-आम्हा सर्वांनाच तसा अपरिचित प्रांत आहे.

इतर अनेक प्रांतांची गोष्ट तशी नाही. काश्मिर एवढा शेकडो मैल दूर, पण त्याच्या सृष्टिसौंदर्याची भुरळ तमाम भारतावर आहे. मुळात भौगोलिकदृष्टयाही फारशा दूर नसलेल्या दक्षिण भारताशी इडली आणि सांबाराच्या जोरावर आपला परिचय चांगलाच घनिष्ट झाला आहे. नेताजींपासून रवींद्रनाथ टागोरांपर्यंत अनेक राष्ट्रपुरुषांमुळे बंगालही आपल्याला जवळचा वाटत आला आहे. पंजाब आणि राजस्थानही आम्हाला कधीच खूप दूरचे वाटले नाहीत.

आसाम या सर्व प्रांतांपेक्षा आगळावेगळा आहे, हे तर खरेच; पण त्याहीपेक्षा महत्त्वाची बाब म्हणजे उर्वरित भारताशी असलेले आसामचे नाते चिंता वाटावी, इतके तकलादू आहे. आसामात जाताना मला याची अजिबात कल्पनाच नव्हती असं नाही; परंतु ज्या जुनाट आणि सातत्याने दुर्लक्षिण्यात आलेल्या समस्येतून आसामातील सध्याचे आंदोलन उभे राहिले ती समस्या आसामच्या उर्वरित भारताशी असलेल्या संबंधांशी इतकी घनिष्टपणे निगडित असेल याची कल्पना मात्र नव्हती.

अर्थात, असमियांच्या वेदनेचा, त्यांच्या समोरील प्रश्नांचा हा झाला केवळ एक भाग. आसामातील सध्याचं आंदोलन नीटपणे समजून घ्यायचं असेल तर या सर्वच प्रश्नांची पाळेमुळे शोधून काढायला हवीत.

## आसामचा शिवाजी

ही पाळेमुळे शोधत असताना एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत आपणास मागे गेले पाहिजे. सतराव्या आणि अठराव्या शतकात देशाच्या फार मोठ्या भागात मुसलमान बादशहांची सत्ता सुरू होती. त्या काळात बिहार आणि बंगालात राज्य करणाऱ्या मुस्लिम राजांनी आसामवर कब्जा मिळविण्यासाठी बरेच प्रयत्न केले. तेराव्या शतकापासून अठराव्या शतकाच्या अखेरीपर्यंत वेगवेगळ्या मुस्लिम बादशहांनी एकूण सतरा वेळा आसाम जिंकण्याचा प्रयत्न केला; पण आसामच्या राजांनी हे सारे प्रयत्न अक्षरशः धुळीला मिळविले. शिवाजी आणि राणा प्रतापच्या रांगेत बसण्याची योग्यता असलेल्या 'लाचित' नावाच्या असमिया सेनापतीने या काळात फार मोठा पराक्रम गाजविला. आजही लाचितला असमियांच्या इतिहासात मानाचे स्थान आहे. या लाचितबद्दल माहिती देताना अनेकांनी त्याची शिवाजीमहाराजांशी तुलना केली. फार काय, पण शिवाजीला दैवत मानून जशी शिवसेना आपल्याकडे कार्यरत आहे तशीच एक लाचितसेना आसामातही काही काळ कार्यरत होती.

लाचितने मुस्लिम साम्राज्यापासून आसाम वाचविण्यासाठी यशस्वी प्रयत्न केले. त्यानंतर अहोम घराण्याची सत्ता बराच काळ आसामवर होती. या घराण्याची राजवट असतानाच १८२६ मध्ये इंग्रजांनी आसाम जिंकले आणि आसामचा ब्रिटिश साम्राज्यात समावेश झाला. राजकीयदृष्टया उर्वरित भारताशी आसाम संलग्न झाला तो याच वेळी.

अर्थात, इंग्रजांनाही आसामात सहजासहजी प्रवेश मिळू शकला नाही. मोगलांशी सतरा वेळा यशस्वी झुंज देणाऱ्या आसामने इंग्रजांचे आक्रमण थोपविण्यासाठीही प्रखर लढा दिला. आसाम जिंकण्याचे इंग्रजांचे प्रयत्न १८१९ मध्ये कसोशीने सुरू झाले; पण असंख्य छोट्या-मोठ्या लढाया व चकमकींनंतर १८२६ मध्येच आसाम पूर्णपणे इंग्रजांच्या आधिपत्याखाली येऊ शकला. १८१९ ते १८२६ ही वर्षे आसामच्या इतिहासातील सर्वाधिक गोंधळाची आणि अस्थिरतेची वर्षे म्हणावी लागतील. सतत सात वर्षे अहोम घराण्यातले आसामचे तत्कालीन शासक धुमश्चक्रीत गुंतले होते आणि सर्वसामान्य जनता अक्षरशः जीव मुठीत धरून जगत होती.

आसाम जिंकण्यासाठी ब्रिटिशांनी एवढे शर्थीचे प्रयत्न करावेत याला कारणेही तशीच आहेत. अहोम राजाकडे वकील म्हणून आलेल्या साहेबाने या प्रदेशातील विपुल नैसर्गिक संपत्तीची तपशीलवार माहिती जमा केली. असमियांना त्या काळात चहाच्या लागवडीची माहिती नव्हती, त्यामुळे चहाचे मळे वगैरे नव्हते; परंतु तुरळक प्रमाणात दिसणारी रानगवताबरोबर उगवलेली चहाची रोपे साहेबाच्या नजरेतून सुटली नाहीत. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात असलेल्या वनस्पतींचीही साहेबाने नोंद घेतली. थोडक्यात म्हणजे विपुल नैसर्गिक संपत्ती असलेला हा प्रदेश ब्रिटिश साम्राज्याचा भाग बनवायचाच असा जणू निश्चय साहेबाने केला आणि परिणामस्वरूप १८१९ पासून आसामवर इंग्रजांच्या चढाया सुरू झाल्या.

याच काळात, आसामातील अंदाधुंदीचा फायदा घेऊन शेजारच्या ब्रह्मदेशातून मोठ्या प्रमाणावर ब्रह्मी लोक आसामात घुसले.

इंग्रजांनी आसामवर कबजा मिळविला तेव्हा आसाम हा एक रोगग्रस्त प्रदेश म्हणून ओळखला जात असे. दलदलीचा प्रदेश विस्तृत असल्यामुळे मलेरियासारखे रोग फैलावणे कठीण नव्हते. त्यात पुन्हा या प्रदेशाच्या दमट हवेमुळेही निरोगी वातावरण निर्माण होणे कठीण होते. कदाचित याच कारणांमुळे की काय, परंतु इंग्रज येण्यापूर्वी विस्तराच्या मानाने आसमची लोकसंख्या खूपच कमी होती.

इंग्रज आसामात आले तेच मुळी या प्रदेशातील विपुल नैसर्गिक संपत्तीचा पुरेपूर फायदा उठविण्यासाठी. इंग्रज येईपर्यंत या भागात मोठ्या प्रमाणावर भाताची लागवड होत असे. अर्थात भाताचे हे उत्पादन आसामबाहेर जात नसे. आपल्या परिवारापुरते भाताचे पीक घ्यावे, थोडीफार विक्री करावी आणि मिळतील त्या चार पैशात सुखासमाधानाने उदरनिर्वाह करावा असे असमियांचे साधे सरळ सुखी जीवन होते.

इंग्रजांनी आल्या आल्या चहाची लागवड सुरू केली. आसामच्या उंच-सखल टेकड्यांच्या प्रदेशातील सुपीक जमिनीत चहाचे पीक मोठ्या प्रमाणावर येऊ लागले. या चहाच्या मळ्यात काम करण्यासाठी मजुरांची गरज होती. हे मजूर स्थानिक असमिया लोकांमधून मिळणे कठीण होते. कारण एक तर भाताच्या पिकावर उदरनिर्वाह करणाऱ्या असमियांना चहाच्या मळ्यात काम करण्याची गरज नव्हती आणि तरीही जे कामगार उपलब्ध होते ते थोड्या-थोडक्या मजुरीवर काम करण्यास तयार नव्हते. परिणामतः चहाच्या मळ्यांच्या मालकांनी आसपासच्या नेपाळ, बिहार आणि बंगालमधून लाखो मळे-कामगार आणण्यास सुरुवात केली. एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास परप्रांतीय मळे-कामगारांचे लोंढेच्या लोंढे आसामात येऊन स्थायिक झाले आणि असमिया नागरिक आपल्याच प्रदेशात अल्पसंख्य बनण्याची प्रक्रिया सुरू झाली. या सुरुवातीच्या काळातही आसामच्या एकूण लोकसंख्येत सुमारे २०% केवळ चहाच्या मळ्यां-

वरचे मजूर होते आणि हे प्रमाण उत्तरोत्तर वाढत गेले आहे.

आसामात स्थायिक होणाऱ्या या परप्रांतीयांमध्येही वेगवेगळे प्रकार होते. चहाच्या मळयांची संपूर्ण मालकी ब्रिटिशांकडे होती आणि मळयातला कामगारवर्ग बिहारी आणि नेपाळी होता. या मळयांचे हिशोब ठेवण्यासाठी आणि अन्य व्यवस्थापकीय कामांसाठी याच सुमारास मोठ्या प्रमाणावर बंगालीबाबू आसामात यायला सुरुवात झाली. असमिया-बंगाली या संघर्षांत बंगाली वरचढ ठरू लागण्यास आणि बंगाल्यांच्या सार्वत्रिक वरचष्म्यामुळे असमियांच्या मनात एक वेगळाच न्यूनगंड निर्माण होण्यास सुरुवात झाली, ती नेमकी याच सुमारास.

चहापाठोपाठच आसामात तागही आला. आला म्हणण्यापेक्षा ब्रिटिशांमार्फत तो आणला गेला. तागाची लागवड करण्यासाठी पूर्वबंगालप्रमाणेच आसामातही अनुकूल परिस्थिती आहे हे ओळखून ब्रिटिशांनी आसमात प्रथमतः तागाची लागवड केली; पण लागवड ही गोष्ट सोपी नाही. तागाची मशागत आणि अन्य कामे कष्टाची आहेत.आधीच कष्टाच्या कामाची सवय नसलेल्या, किंबहुना कष्टासाठी आवश्यक ते physic नसलेल्या असमियांना तागाची लागवड जमण्यासारखी नव्हती. परिणामतः इंग्रजांनी मोठ्या प्रमाणावर पूर्वबंगाल्यांना आसामात आणले आणि आसामात आणखी एका परप्रांतीयाचा शिरकाव झाला. कलकत्त्यात इंग्रजांच्या तागाच्या गिरण्या मोठ्या प्रमाणावर नफा कमवीत होत्या, त्यांना सातत्याने कच्चा माल पुरविण्याचे काम आसामातील तागाच्या लागवडीनं अधिक सुलभ झाले. थोडक्यात म्हणजे चहा असो किंवा ताग असो, आसामच्या सुपीक जमिनीतून इंग्रजांनी काढलेल्या उत्पादनामुळे आसामचे महत्त्व वाढले हे जरी खरे असले तरी याच उत्पादनामुळे आसामात परप्रांतीयांसाठी दरवाजे अधिकाधिक खुले होत गेले.

१८३० च्या सुमारास आसामात लागवड सुरू झाली. त्यामुळे बिगरआसामिया लोकांचे प्रमाण जसे वाढले तसेच मुस्लिमांचे प्रमाणही वाढलं. १८२६ पूर्वी आसामात, साधारणतः एकूण लोकसंख्येच्या सुमारे एक टक्का मुस्लिम होते. आसाम मुस्लिमांच्या आक्रमणाचा बळी न बनता देखील आसामात एक टक्का मुस्लिम होते ते केवळ अहोमराजांनी पकडलेल्या मुस्लिम युद्धकैद्यांमुळेच. बंगालमधून तागाच्या लागवडीसाठी हजारो मजूर इंग्रजांनी आसामात आणले, त्यात बहुसंख्य मुस्लिम होते. शिवाय पूर्वबंगालसारखंच नैसर्गिक वातावरण असलेल्या पण पूर्वबंगालच्या तुलनेत सर्वच बाबींची मुबलकता असलेल्या या प्रदेशात स्थायिक होणं सर्वच पूर्वबंगाल्यांना विशेष आवडले. स्वाभाविकच एका कुटुंबातला एकजण केवळ आसामात आला नाही तर सर्व कुटुंबच्या कुटुंब किंवा अनेक कुटुंबे आसामात येऊन स्थायिक झाली. इंग्रजांच्या काळात राजरोसपणे आसामात आलेल्या आणि स्वातंत्र्यानंतर राज्यसरकारने जाणूनबुजून दुर्लक्ष केल्याचा फायदा घेऊन घुसखोरांच्या रूपात आसामात स्थायिक होणाऱ्या पूर्वबंगाल्यांमध्ये मुसलमानांचे प्रमाण स्वाभाविकपणेच मोठे होते. परिणामतः आज आसामच्या एकूण लोकसंख्येत मुसलमान सुमारे २८% आहेत.

एकोणिसाव्या शतकात, अनुकूल नैसर्गिक परिस्थिती व मुबलक मोकळी जागा असतानाही आसामची लोकसंख्या मर्यादित होती. त्या काळात आसामच्या लोकसंख्येची घनताही खूपच कमी होती. सामान्यतः एका चौरस मैलाच्या क्षेत्रात त्या काळात अवघी ४० माणसे राहत असत. आज परिस्थिती बदलली आहे. आसामात आज हजारो नेपाळी आहेत, रिक्षा चालविणारे, चहाच्या मळयात अंगमेहनतीची कामे करणारे हजारो बिहारी कामगार आहेत, चहाच्या मळयात बाबूगिरीसाठी आसामात आलेले आणि असमियांना वरचढ ठरलेले बंगाली आहेत, मारवाड्यांची संख्याही बरीच मोठी आहे. आसामच्या नैसर्गिक संपत्तीचा फायदा उठविण्यासाठी आसामात आलेले हे परप्रांतीय आणि अक्षरशः हजारो परदेशी नागरिक यांनी आज आसामात एकच गर्दी केली आहे. परिणामतः एका चौरस मैलाच्या क्षेत्रात आज २०० व्यक्ती रहात आहेत आणि आसाम हा ग्रामीण भारतात लोकसंख्येची सर्वाधिक घनता असलेला भाग बनला आहे.

## वरचढ बंगाली

आसामात आल्यानंतर अनेकांच्या भेटीगाठी घेताना आसामात स्थायिक झालेल्या या विविध प्रकारच्या लोकांच्या वृत्ती-प्रवृत्तीही ध्यानात आल्या. आसामात असमिया विरुद्ध बंगाली असा संघर्ष वारंवार होत गेला व आजही तो सुरू आहे. याचे एक मुख्य कारण हृणजे बंगाल्यांनी असमियांबाबत बाळगलेला दृष्टिकोन व त्यांना दिलेली वागणूक. इंग्रजांच्या कृपेने चहाच्या मळयातील कामगारांवर सत्ता गाजविण्यासाठी बंगालमधून आलेल्या बंगाल्यांनी आसामच्या मुख्य प्रवाहाशी कधीच समरस होण्याचे प्रयत्न केले नाहीत. किंबहुना आपण कोणी तरी खूप बुद्धिमान वगैरे आहोत आणि असमियांवर सत्ता गाजविण्यासाठीच आपला जन्म झाला आहे अशीच बंगाल्यांची वृत्ती राहिली. त्यामुळे आसामात राहूनही आपला तद्दन बंगालीपणा टिकविण्याचेच प्रयत्न त्यांनी केले. 'बंगाल्यांनी आसामियांना हिणविण्यात, त्यांना अपमानित करण्यातच सतत आनंद मानला !' असा आरोप करून एका असमिया प्राध्यापकाने मला सांगितले की बंगाल्यांच्या या वृत्तीमुळे असमिया समाजात एक भयानक न्यूनगंड निर्माण झाला व त्याचे अनेक सामाजिक दुष्परिणाम आजही दृग्गोचर आहेत. बंगाल्यांनी आसामात प्रवेश केला तेव्हा असमिया लोक अशिक्षित होते. बाहेरच्या जगाची त्यांना फारशी माहिती नव्हती, चहा आणि तागाच्या लागवडीचे तंत्रही त्यांच्याजवळ नव्हते. 'तुमच्याजवळ हे काहीही नाही, तुम्ही निर्बुद्ध आहात, तुम्हाला व्यापार माहिती नाही, भाताशिवाय अन्य कोणत्याही पिकांची माहिती नाही, आम्ही आलो म्हणून तुम्ही आज एवढी तरी प्रगती करू शकलात, नाही तर सगळा आनंदच होता!, या आणि अशा प्रकारे कोणी एखाद्याला सतत हिणवू लागले तर काय होईल ? असमिया नागरिक या सततच्या हिणविण्यामुळेच काय, अगदी काल-परवापर्यंत आपला स्वाभिमानच गमावून बसल्यासारखा नकोइतका साधा आणि शांत राहिला.

असमिया भाषेनेही असमिया-बंगाली संघर्षात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. वस्तुतः, प्रारंभीच्या काळात असमिया ही केवळ बोली भाषा होती. असमिया भाषेला स्वतःची अशी फारशी स्वतंत्र लिपी नव्हती, आजही नाही. असमिया, बंगाली आणि उरीया या

तिन्ही भाषांच्या लिपीत खूपसे साम्य आहे, याचा पुरेपूर फायदा बंगाल्यांनी उठविला. इंग्रजी राजवटीत बाबू म्हणून आसामात आलेल्या बंगाल्यांनी 'असमिया ही स्वतंत्र भाषा नव्हेच, ती केवळ बंगालीची एक Dialect आहे, केवळ एक बोलीभाषा आहे' असा इंग्रजांचा समज करवून असमियांच्या नाकावर टिच्चून बंगाल्यांनी बंगाली भाषा राजदरबारी रुजू करवून घेतली. बंगाल्यांच्या धूर्तपणाचे हे एक उदाहरण आहे. असमिया, त्या काळात हा धूर्तपणा लगेचच ओळखू शकले नाहीत, तसा तो ते ओळखते तर बंगाली भाषेलाही स्वत:ची अशी स्वतंत्र लिपी नसून आसामिया, बंगाली आणि उरिया या तिन्ही भाषांसाठी थोडचाफार फरकाने पूर्व-मागधी लिपी वापरली जाते ही गोष्ट असमियांनी तेव्हाच इंग्रजांच्या नजरेत आणून दिली असती.

बंगाली नागरिक स्वत:च्या अहंगंडामुळे आसामात पिढयान्पिढया राहूनही असमिया होऊ शकला नाही. प्रामुख्याने बंगाली हिंदूंची भूमिका ही अशीच राहिली. बंगाली मुसलमान मात्र हिंदू बहुसंख्यांकांच्या या प्रदेशात परिस्थितीशी जुळवून घेऊ लागला. बऱ्याच प्रमाणात बंगाली मुसलमान असमियांच्या मूळ जीवनप्रवाहाशी समरस झाला. कदाचित यामुळे कधी काय; पण आसामात बंगाली–असमिया संघर्ष वारंवार पेटले तरीही हिंदूविरुद्ध मुस्लिम असा संघर्ष मात्र पेटला नाही.

बंगाल्यांसारखेच आसामात राहूनही असमिया न बनण्याचे प्रयत्न काही प्रमाणात मारवाडी समाजानेही केले; पण बंगाल्यांइतकी मारवाडयांची संख्या मोठी नाही. त्यामुळे मारवाडयांच्या या दृष्टिकोनाची फारशी कोणी दखलही घेतली नाही.

बिहारी व नेपाळयांचीही आसामातील लोकसंख्या कमी नाही; परंतु या दोन्ही प्रांतांतील लोकांनी बऱ्याच प्रमाणात असमियांशी समरस होण्याचे यशस्वी प्रयत्न केले असे म्हणता येईल.

जाता जाता, असमिया आणि बंगाली या भाषांमधील संघर्षाबद्दल आणखी थोडे सांगितले पाहिजे. एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातच आसामातील इंग्रजी साम्राज्यात प्रशासकीय नौकर म्हणून काम करणाऱ्या बंगाल्यांनी आसामात बंगाली ही राजव्यवहाराची अधिकृत भाषा म्हणून घोषित करवून घेतली. इंग्रजांच्या प्रोत्साहनामुळे या काळात बंगालीचा चांगला विकास झाला आसामिया मात्र खुजीच राहिली. फार काय, पण असमिया ही स्वतंत्र भाषा असल्याचा शोधही काहीसा उशीराच लागला. आसाम साहित्यसभेचे अध्यक्ष श्री. रजनीकांत शर्मा यांनी माझ्याशी बोलताना सांगितलं की, असमिया भाषेचं स्वतंत्र अस्तित्व अठराव्या शतकात काही ख्रिश्चन मिशनऱ्यांमुळेच जगाच्या ध्यानात आले. या भागात प्रथमच आलेल्या मिशनऱ्यांनी बंगाली भाषा या भागातील लोकांना समजत नाही हे लक्षात आल्यानंतर असमिया भाषेचा पद्धतशीर अभ्यास केला. ब्राउन नामक एका ख्रिश्चन असमिया भाषेचे व्याकरण ओळखून ते लिहून काढले तर ब्रॉनसन नावाच्या त्यांच्या सहकाऱ्याने पहिला असमिया–इंग्रजी शब्दकोश तयार केला.

एकोणिसाव्या शतकातच असमिया भाषेत अनेक चांगल्या साहित्यकृती तयार झाल्या. असमिया भाषेला काहीशी ऊर्जितावस्था मिळाली. असमियांचा भाषाभिमान जागृत झाला. परिणामत: १९०० च्या सुमारास हेमचंद्र बरुआ आणि देवेंद्र फूकन या तत्कालीन ज्येष्ठ साहित्यिकांनी बंगाली भाषेविरुद्ध सर्वप्रथम रणशिंग फुंकले. बऱ्याच कसोशीच्या प्रयत्नांनंतर बंगालीऐवजी असमिया ही राजभाषा करण्याचा आग्रह शासकांनी मानला.

असमिया–बंगाली संघर्षात बंगाल्यांनी असमिया भाषेला या काळापर्यंत अतिशय हीन वागणूक दिली; परंतु याच काळात एक गोष्ट उजेडात आली ती अशी की, सुमारे १५ व्या शतकाच्या सुमारासच असमियात 'कथागीत' नावाची एक श्रेष्ठ रचना निर्माण झाली होती. 'भगवद्‌गीतेचे हे कथारूप असमियात निर्माण झाले तेव्हा बंगाली भाषेत एक वाक्यसुद्धा लिहिले गेले नव्हते.' ही बाब असमिया आज अभिमानाने सांगतात. खुद्द रवींद्रनाथ टागोरांपासून अनेकांनी आसामियातील या ऐतिहासिक साहित्यकृतीची श्रेष्ठता मान्य केली असून असमियांना त्यामुळे एक आगळे मानसिक समाधान मिळाले आहे.

अर्थात अस्मिता दुखावलेले असमिया आपल्या भाषेबद्दलचा अभिमान म्हणण्यापेक्षा, बंगाली भाषेचा दुस्वास करीत असले तरी बंगाली भाषेचा व्याप मोठा आहे, यात शंका नाही. हिंदीच्या खालोखाल आज भारतात बंगाली भाषा बोलणाऱ्यांची संख्या मोठी असून ती सुमारे १४ कोटी आहे. याउलट असमिया भाषा बोलणाऱ्यांची संख्या अवघी साठ लाख आहे!

## असमिया तिसऱ्या क्रमांकावर

आसामातील जनआंदोलन हे प्रामुख्याने विदेशी नागरिकांच्या प्रश्नावर असले तरी एका विशिष्ट संदर्भात आसामातील जनतेच्या साचत आलेल्या वेदनेचा तो एक उद्रेक आहे. एकोणिसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंतच्या अहोम राजघराण्याच्या राजवटीच्या उज्ज्वल इतिहासानंतर ब्रिटिशांच्या कारकीर्दीत असमिया जनतेची जी सार्वत्रिक कुचंबना झाली, जो एक न्यूनगंड या जनतेत निर्माण झाला आणि जोपासला गेला, जे एक दुय्यम दर्जाचे स्थान आपल्याच राज्यात असमियांना स्वीकारावे लागले, त्यात या उद्रेकाची पाळेमुळे आहेत.

विविध कारणांमुळे मोठया संख्येने आसामात आलेल्या आणि आणविल्या गेलेल्या बंगाल्यांचे वर्चस्व आणि बंगाली भाषेने असमिया भाषेवर केलेली कुरघोडी याचा परामर्ष आपण घेतला. आता या प्रश्नाची प्रामुख्याने राजकीय आणि आर्थिक पार्श्वभूमीही लक्षात घ्यायला हवी.

इंग्रजांच्या प्रोत्साहनाने लाखो बंगाली आसामात आले. यात मुस्लिमांची संख्या मोठी होती; परंतु हिंदू बहुसंख्यांकांच्या या प्रदेशात प्रारंभी सबंध मुस्लिम समाज तिय्यम दर्जाच्या स्थानावरच राहिला. या शतकाच्या सुरुवातीपर्यंत व त्यापुढेही काही वर्षे सर्व सरकारी कचेऱ्या, चहाचे मळे, कोळशाच्या खाणी, ताग-उद्योग या सर्व ठिकाणी सर्व व्यवस्थापकीय पदे तुलनेने सुशिक्षित अशा बंगाल्यांच्या हातात होती. फार काय पण आसामातील सध्याच्या आंदोलनात सक्रीय असलेल्या पूर्वांचलीय लोकपरिषद या प्रादेशिक पक्षाने तर असेही म्हटले आहे की, स्वातंत्र्यपूर्व काळात सर्व सरकारी अधिकाऱ्यांच्या जागा या बिगर असमिया लोकांमधूनच भरण्यात

येत असत. त्यामुळे स्वाभाविकच तत्कालीन सामाजिक रचनेत सधन, सुशिक्षित बंगाली पहिल्या श्रेणीत होते. असमियांचे स्थान दुसरे होते आणि यापैकी बहुसंख्य भाताची शेती करणारे आणि इतर परंपरागत उद्योग-व्यवसाय करणारे होते. पूर्व बंगालमधून आलेले मुस्लिम सामान्यतः निरक्षर असल्याने त्यांना तिय्यम दर्जाचे स्थान होते. या तिघांपैकी असमियांची संख्या, त्यांच्या लोकसंख्येत अनैसर्गिक वाढ न झाल्याने फारशी वाढली नाही. उलट बंगाली आणि पूर्व बंगाली मुस्लिम हजारोंच्या संख्येने आसामात आल्याने त्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत राहिली. ही संख्या वाढण्यामागे इंग्रजांचे प्रोत्साहन हे जसे एक कारण आहे तसेच आसामातील अनुकूल परिस्थिती, ताग व भाताच्या मुबलक पिकासाठी आवश्यक ती सुपीक जमीन या सर्व वातावरणाच्या आकर्षणातून बंगाल्यांचे लोंढेच्या लोंढे आसामात येऊ लागले, हा इतिहास आहे.

याच काळात छोटया-मोठ्या हिंदु-मुस्लिम संघर्षांनाही सुरुवात झाली आणि नेमक्या याच नाजूक स्थितीचा फायदा ब्रिटिश सत्ताधाऱ्यांनी घेतला. 'तोडा-फोडा आणि राज्य करा' या न्यायाप्रमाणे त्यांनी हिंदु-मुस्लिम संघर्ष सदैव पेटता ठेवला व त्यातही जाणूनबुजून मुस्लिमांना झुकते माप दिले. परिणामतः १९३७ साली राज्याराज्यात स्वायत्त सरकारे स्थापन झाली तेव्हा आसामचे मुख्यमंत्रिपद पूर्वबंगालमधून आलेल्या मुस्लिमांच्या एका नेत्याला, म्हणजे सर महंमद सादुल्ला यांना देण्यात आले. आत्तापर्यंत सामाजिक रचनेत तिय्यम दर्जावर असणाऱ्या मुस्लिमांपैकी एकजण मुख्यमंत्री म्हणून आपल्यावर लादला जातो ही गोष्ट असमियांमधील न्यूनगंडाला खतपाणी घालणारीच ठरली. नव्या सामाजिक रचनेत मुस्लिम प्रथम श्रेणीत, बंगाली द्वितीय श्रेणीत गेले आणि परिणामतः असमिया तृतीय श्रेणीत अक्षरशः ढकलले गेले. सर सादुल्लांच्या राजवटीतील नमूद करण्यासारखी एक गोष्ट म्हणजे या काळात इंग्रजांच्या सहकार्याने पूर्व-बंगालमधील मैमनसिंग ते अप्पर आसाम भागातील नौगावपर्यंत खास रेल्वेमार्ग टाकण्यात आला, जेणेकरून पूर्व बंगाल्यांना आसामात येण्याचे अधिकच सोयीचे झाले. १९३८–३९ या काळातील गोपीनाथ बार्डोलोई मंत्रिमंडळाचा अपवाद वगळता सर सादुल्ला १९४६ पर्यंत सलगपणे सत्तेवर राहिले.

या काळात प्रारंभी, स्थानीय लोकांशी फटकून राहण्याच्या हिंदूंच्या वृत्तीमुळेच की काय पण बंगाली मुस्लिम आणि असमिया समाजात बरेच सुसंवादित्व निर्माण होऊ शकले. परंतु पुढे पुढे सत्ताधाऱ्यांचे असमियांशी जमू लागलेले सूत पाहून बंगाली हिंदूंनी मुस्लिमांशी जमवून घेणे पसंत केले आणि असंघटित असमियांना एकाकी पाडण्याचे पद्धतशीर प्रयत्न सुरू झाले.

१९४७ मध्ये आपण स्वतंत्र झालो त्या सुमारास तत्कालीन राष्ट्रीय नेते फाळणीला मान्यता देत असताना, असमियांची इच्छा लक्षात न घेता, आसामला भारतापासून तोडण्यास मान्यता देऊन जो एक भीषण अन्याय करू पहात होते तो कसा टळला हे पाहण्यापूर्वी स्वातंत्र्यासाठीच्या चळवळीत आसामची भूमिका काय होती व असमियांचे योगदान कोणते हे पाहणे आवश्यक आहे.

[ क्रमशः ]

**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

**नाझी भस्मासुराचा उदयास्त**

**लेखक : वि. ग. कानिटकर**
**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**
**किंमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# व्रतस्थ पत्रकार

# ना. बा. लेले

माधव ज. जोशी

१६ फेब्रुवारी १९८० ... ग्रहणाने दिल्ली शहरास ग्रासले होते. स्पर्शकाल सुरू होण्यास तब्बल दहा मिनिटे होती तरीही रहिवासी दारेखिडक्या गच्च बंद करून सूर्याचा किरणही घरात येणार नाही याची खबरदारी घेत होते. प्रथमच दिल्ली शहरावर प्रेतकळा अवतरली होती. भव्य रस्ते सुनसान पडले होते. अपवाद म्हणूनसुद्धा एखादे वाहन दिसत नव्हते. अशा वेळी इंडियागेटजवळून एक स्कूटरस्वार रमतगमत चालला होता. दुरूनही त्याची भरदार किंबहुना आडवी शरीरयष्टी डोळ्यात भरत होती. शुभ्र पांढरा लेंगा, झब्बा व त्यावर जाकीट, डोळ्यांना उन्हाचा चष्मा आणि डोक्यावर शिरस्त्राण...रस्त्यावर चिटपाखरू नव्हते तरीही स्कूटरस्वाराचा हात सवयीने तो ज्या दिशेने वळत होता ती दिशा दर्शवीत होता, स्कूटरवर मागे बसल्या बसल्या मी दिल्ली शहराची भव्यता नजरेत सामावून घेण्याचा प्रयत्न करीत होतो. प्रजासत्ताकदिनाच्या दिवशी ह्याच रस्त्यावर लाखो लोकांचे डोळे उत्सुकतेने खिळले होते. प्रेक्षकांसाठी बांधलेल्या सज्जांचे सामानही पूर्णपणे हलविलेले दिसत नव्हते. सायकलवरून एक पोलीस-अधिकारी आमच्या दिशेने येताना दिसला. त्या बिचाऱ्याला आश्चर्य वाटलेले दिसत होते. पण स्कूटरवर बापूरावांना पाहताच तो स्मित करून पुढे गेला.

बापूरावांची आणि माझी अनेक दिवस पत्रापत्री चालू होती. हिंदुस्थान समाचारचे ते खजिनदार होते, तसेच वृत्तसंपादकही होते. अर्थातच आणीबाणीपर्यंत! काही वर्षांपूर्वी हिंदुस्थान समाचारच्या रौप्यमहोत्सवानिमित्त प्रसिद्ध केलेली स्मरणिका पाहिल्यावर तर या माणसाला एकदा तरी भेटलेच पाहिजे असा निश्चय केला होता आणि आज ग्रहणाच्या दिवशी त्यांची व माझी प्रथम भेट होत होती. मला प्रथमदर्शनीच हा माणूस फार आवडला. त्यांची भरदार शरीरयष्टी, शरीराच्या मानाने लहान वाटणारे मिस्कील डोळे, चेहऱ्यावरील उमदेपणा आणि साधेभोळेपणा अगदी जळगावकरांना साजेसा!

बापूरावांचे बालपण जळगावातच गेले. भव्य घर आणि त्याहूनही भव्य व रसिक असे वडील–बाबा लेले! कै. बालगंधर्वांचा जळगावातच मुक्काम असला की ते 'देवा! देवा' करीत बाबा लेल्यांच्या बैठकीत येत असत. गोहरबाईंनाही या घरात मज्जाव नव्हता. कधीकधी विष्णुपंत औंधकरांचाही मुक्काम असायचा. अशा रसिक आणि सधन घराण्यात जन्मलेले बापूराव मात्र पूर्णपणे वेगळे होते. लहानपणापासून त्यांचा ओढा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे होता. बाबासाहेबांना हे पसंत नव्हते. तरीही त्यांनी बापूरावांना विरोध दर्शविला नाही.

सोळाव्या वर्षी मुंबईत सिडनेहॅममध्ये दाखल झाल्यानंतर तर त्यांना स्वातंत्र्यातच आनंद वाटू लागला. त्यांच्या मते प्रत्येक माणूस हा शेवटी एकटाच असतो आणि या तत्त्वज्ञानातूनच त्यांच्या जीवनाची जडणघडण झाली! विसाव्या वर्षी पदवीपरीक्षा पास झाल्यानंतर जळगावात इन्कमटॅक्स एक्सपर्ट होऊन प्रॅक्टिस करण्याची वडिलांची इच्छा नम्रपणे नाकारून त्यांनी काही दिवस सांगली, मिरज, बडोदा, अहमदाबाद येथे संघाचा प्रचारक म्हणून काम केले. त्यानंतर त्यांनी आपले बस्तान दिल्लीस हलविले. जनता पक्षाचे सरचिटणीस श्री. नानाजी देशमुख हेसुद्धा त्याच वेळी महाराष्ट्र सोडून प्रचारक म्हणून बिहारमध्ये गेले. वास्तविक पहाता दोन समवयस्क व्यक्ती. पण दोघांच्या कार्यपद्धती वेगळ्या! बापूरावांनी प्रसिद्धीची कास न धरता पत्रकारितेचा वसा अंगिकारला आणि आज साठाव्या वर्षीही ते ताठ मानेने तो वसा चालवीत आहेत. राजकारणात सक्रिय भाग घेण्यापेक्षा आपल्या कार्याबरोबरच राजकारणाचा अभ्यासक म्हणून राहण्यात आणि पत्रकाराच्या त्रयस्थ दृष्टीने त्यावर टीकाटिप्पणी करण्यात त्यांनी धन्यता मानली. राजकारणापेक्षा समाजकारणात त्यांना जास्त रस असल्यामुळे हा पेशा त्यांनी स्वीकारला असावा.

बापूरावांनी संघाचा प्रचारक आणि पत्रकार या आपल्या दोन्ही भूमिकांमध्ये कधीच गल्लत होऊ दिली नाही आणि याचेच फळ म्हणजे माननीय यशवंतराव चव्हाण, अटलबिहारी वाजपेयी, लालकृष्ण अडवाणी, जगन्नाथराव जोशी, मधु दंडवते, वसंत साठे या मंडळींशी जोडलेला स्नेह. या मंडळीत फिरतानाही त्यांनी स्वतःच्या पेशाचे भान ठेवून कधीही तत्त्वांशी आणि नीतिमत्तेशी तडजोड केली नाही.

१९४८–४९ साली श्री. दादासाहेब आपटयांनी मुंबईला घोगा स्ट्रीटवर एका लहानशा खोलीत हिंदुस्थान समाचारची सुरुवात केली. साहजिकच बापूराव त्यांच्याकडे आकर्षित झाले; पण दादासाहेबांना संघाकडे आकर्षित केले बापूरावांनीच. सुप्रसिद्ध पत्रकार श्री. आप्पा पेंडसे यांनी एका ठिकाणी लिहिले आहे...'मान खाली घालून तावच्या ताव कार्बन कॉप्या काढणारा ईर्षाबाज तरुण म्हणजेच बापूराव लेले आणि त्या कॉप्या म्हणजेच तेव्हाचा हिंदुस्थान समाचार. ज्या वेळी तो कॉप्या काढीत नसे तेव्हा त्याची सायकलवर मांड असे. ती सायकल त्याची स्वतःची की कोणी दिलेली हे मला माहीत नाही.'

सुरुवातीपासूनच बापूरावांनी समाचार हेच आपले जीवनसर्वस्व मानले. स्वतःला झोकून देण्याची सवय असणाऱ्या त्यांनी अस्थिर जीवनातच आनंद मानला. त्यांच्या बरोबरीच्या तरुणांचे दोनचे चार हात होत असलेले पाहून त्यांच्या आईवडिलांना वाटे की बापूनेही संसार थाटावा...पण ही इच्छा पुरी होणार नाही ही सुद्धा त्यांना खात्री होती.

आडव्या शरीरयष्टीचा (त्यांना माझी दृष्ट न लागो...) हा माणूस स्वभावाने फार प्रेमळ आहे. त्यांच्या रुक्ष (म्हणजे शब्दशः नव्हे) पत्रांवरून त्यांच्याविषयी कल्पना करणे केवळ चुकीचे ठरते हा स्वानुभव आहे. नातेवाईकांना पत्रे लिहितानाही ते एक, दोन, तीन असे क्रमांक लिहून फक्त महत्त्वाचे मुद्दे लिहितात. मराठीचा, हिंदीचा त्यांना अभिमान आहे; पण त्याबाबतीतही त्यांचा दृष्टिकोन 'व्यवहार्य' आहे. बापूरावांनी आत्तापर्यंत कै. लालबहाद्दूर शास्त्रींबरोबर ताश्कंद, तसेच डॉ. राधाकृष्णन् आणि राजेंद्रप्रसाद यांच्याबरोबर विदेश-

दौरे केले आहेत. इतिहासाबद्दल त्यांना फार उत्सुकता असते. दैनंदिन जीवनात रुक्ष पत्र-व्यवहाराबद्दल ख्याती असलेले बापूराव विदेशदौऱ्यावर असताना रसभरित पत्रे लिहून सर्व उणीव भरून काढतात.

बापूरावांचा मित्रपरिवार सर्व भारतभर आणि परदेशांतही विखुरला आहे. माणसे मिळविणे आणि टिकविणे ही कला त्यांना चांगली अवगत आहे. समोरच्या माणसाला ते काही क्षणातच जोखतात. वक्तशीरपणा हा त्यांचा मोठा गुण. सर्व गोष्टी वेळापत्रका-प्रमाणेच झाल्या पाहिजेत ह्यावर त्यांचा मोठा भर असतो. किंबहुना प्रत्येक पत्रकाराने हा गुण अंगी बाणवला पाहिजे ही त्यांची अपेक्षा असते. कारण या क्षणी जी बातमी सनसनाटी असेल तीच काही वेळाने कवडी-मोलाची ठरेल. त्यांच्या घरात सुद्धा सर्व वस्तु जागच्या जागी असतात. दिल्लीच्या काकानगरमधील त्यांच्या ब्लॉकमधे हा ब्रह्मचारी एकटाच राहतो. सोबतीला असतात फक्त वृत्तपत्रे, पुस्तके आणि घणघणणारा फोन!

बापूरावांना विविध कलांमध्ये रस आहे. दिल्लीला आलेली चांगली नाटके ते आवर्जून पाहतात. पुण्यातील एका दैनिकासाठी ते या विषयावर लिहीतही असत. ते हार्मोनियम चांगल्यापैकीं वाजवू शकतात ही गोष्ट कदाचित ते स्वतःही विसरले असतील. या कलां-प्रमाणेच खाण्याचीही त्यांना फार आवड आहे; पण वेळ पडली तर उपाशी राहण्याचीही त्यांची तयारी असते. आणीबाणीच्या काळात तर त्यांनी अन्नदात्याची भूमिका बजावली. आणीबाणीतील त्यांच्या कार्याबद्दल ते कधीच अवाक्षर काढीत नाहीत. फक्त बोलण्याच्या ओघात एकदा पोलिसांचा ससेमिरा चुकविण्यासाठी ते एका सिनेमागृहात काही काळ बसल्याचे कळले. आणीबाणीमध्ये वृत्तसंस्थांचे एकीकरण झाल्यापासून त्यांनी समाचारमधून निवृत्ती पत्करली व स्वतंत्रपणे पत्रकार म्हणून जीवन सुरू केले. जनता राजवटीत त्यांनी परत हिंदुस्थान समाचारमध्ये यावे यासाठी प्रयत्न करण्यात आले; पण त्यांनी नकार दिला. जनता राजवटीत तर ते फार काळजीपूर्वक वागत होते. कारण स्नेहीमंडळीपैकी बरेचजण केन्द्रीय मंत्रिमंडळात होते. स्वतःबद्दल ते कधीच बोलत नाहीत; पण इतर कोणी त्यांच्याबद्दल बोलू लागले की ते संकोचतात.

मुंबई मराठी पत्रकार संघाच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त माननीय प्रवक्ते म्हणून बोलताना बापूराव म्हणाले होते... "अगदी सहजगत्या माझ्यासारख्याने जर अन्य पत्र-कारबंधूंना म्हटले की, अहो, पां. वा. गाडगीळांचा अमुक अमुक संपादकीय लेख अभ्यास पूर्ण व चांगला आहे तर ते लगेच म्हणणार की इंग्रजीत अनुवाद करून थोडक्यात सांगा की, याचा स्पष्ट अर्थ असा आहे की, अद्यापही भारत स्वतंत्र होऊन २५ वर्षे झाल्यानंतरही भारतीय भाषा भगिनींच्या संतानांना जर परस्परांच्या प्रतिभेचा परिचय करून घ्यावयाचा असेल तर त्यांना आपल्या नसलेल्या इंग्रजीचीच कास धरावी लागत आहे. राजकीय रंगमंचावर मराठी भाषि-कांची तोंडे (काही सन्माननीय अपवाद वगळता) काळी ठिक्कर पडलेली दिसतात... भारताच्या संसदेत यांचेपैकी अनेकांना जेव्हा मुखस्तंभासमान बसल्यागत मी पाहतो त्यावेळी मनात सहजपणे विचार येऊन जातो की काय सुमारे चार साडेचार कोटी जागृत मराठी भाषिकांचे हे प्रतिनिधी आहेत की निव्वळ हात वर करणारी ही यंत्रे आहेत?" बापूरावांनी या प्रसंगी मुंबई मराठी पत्रकार संघाला सूचना केली होती की, दरवर्षी एक-दोन पत्रकारांना शिष्यवृत्ती अथवा मदत देऊन दिल्लीत वर्तमानपत्रीय अनुभव घेण्या-साठी पाठवावे. पत्रकारांबद्दल त्यांना नेहमीच आपुलकी वाटत आली आहे. आर्थिक अडचणीत असलेल्या एका पत्रकाराला मदत करण्यासाठी आपले लोकप्रिय झालेले सदर त्याकडे सोपविण्याचा उदारपणा बापूरावच दाखवू शकतात. एका हाताने दिलेली मदत दुसऱ्या हातालाही कळणार नाहीं इतकी प्रसिद्धी पराङमुखताही तेच दाखवू शकतात.

२९ फेब्रुवारीला बापूरावांच्या वयाला ६० वर्षे पूर्ण झाली. त्यांच्या मते तर त्यांचा हा १५ वाच वाढदिवस आहे. त्यांचा उत्साह खरोखर १५ वर्षाच्या तरुणालाही लाजवील असाच आहे. दिल्लीतील मराठी कुटुंबियांना तर त्यांचा फार मोठा आधार वाटतो. आपणही कधी दिल्लीत गेलात आणि काही अडचण आली तर विना संकोच त्यांच्याशी संपर्क साधा. कारण त्यांना ते रोजचेच आहे. काही माणसांचा जन्मच दुसऱ्याकरिता झिजण्यासाठी असतो.

अशा या भरदार व्यक्तिमत्वाच्या ईर्षा-बाज माणसाला दीर्घ आयुरारोग्य लाभो ही ही ईशचरणी प्रार्थना! □

## फिनिक्स निवड

# BALRAJ SAHNI

–(An Autobiography.
Hind Pocket Books,
Pages 218, Rs. 12.
By Balraj Sahni.

श्री. बलराज सहानी हे परकायाप्रवेश करणारे नट होते. तसे बहुतेक पुरुष परकायाप्रवेश करतात असे कोण म्हणाले होते? हो, बहुतेक आपले आप्पासाहेब फडके! फडक्यांच्या या वाक्यावर आचार्य अत्र्यांनी कडक टीकाही केली होती.

पुरुषांनी परकायाप्रवेश करण्याइतके सोपे व सुखावह दुसरे काम नसेल; पण उत्कृष्ट कादंबरीकार, कथाकार किंवा नट जेव्हा परकायाप्रवेश करतात तेव्हा त्यांचे देहभान हरपते. ते पात्रांशी संपूर्ण empathy साधतात. याला परमानसप्रवेश म्हणावे का? श्री. बलराज सहानी टांगेवाला, रिक्षावाला व सुटाबुटातला बिझिनेस एक्झिक्युटिव्ह यांची पात्रे किती सहजतेने वठवीत हे बऱ्याच लोकांना आठवत असेल.

डावीकडे एक मोठी चामखीळ असलेला, भांग पाडलेला, राठ भुवयांचा पण थोडासा effiminate, हनुवटीवर खड्डा असलेला हा नट कित्येक लोकांच्या स्मृतिपटलावर काय-मचे घर करून बसलेला आहे. आणि आवाज? या effiminate (म्हणजे मला अगदी बायकी म्हणायचे नाही; पण थोडासा delicate; परंतु मिशा वाढवल्या की तो अग़दी पुरुषी दिसे.) माणसातून किती अधिकारी, बुलंद, धनीपणा– स्वामीपणा – डौलाचा, सलाबती आवाज निघायचा! याच आवाजाने त्यांनी सिनेमातील गल्लाभरूपणावर जोराने हल्ला चढवला होता. अमिताभ बच्चनी हाणामारी व ढिशांव ढिशांव यांच्या विरुद्धही याच गुर्मीने ते बोलले होते. सैगल जसा बोलण्यातील व गाण्यामधील साकव होता तसे सहानी हे जुने हिंदी सिनेमा व न्यू वेव्ह

सिनेमा यांच्यामधील एक साखळीची कडी होते. अॅक्टिंग करताना डिग्निटी राखली गेली पाहिजे हे त्यांचे पालुपद होते व ते पालुपद त्यांच्यापुरते तरी त्यांनी तडीस नेले.

बलराज सहानींविषयी असे म्हटले जात असे की ते चैनी लालबावटेवाले होते. epicurean, elite communist. कुणीही त्यांना अरिस्टोक्रॅटिक ड्रेसमध्ये सुटाबुटात पाहिले की वाटायचे "अरे हा कम्युनिस्ट ! साल्याचा दिमाख तर राजेशाही आहे !"

बलराज सहानी हे इंग्रजी साहित्याचे व्यासंगी होते. ते M. A. पदवीधर होऊन टागोरांच्या शांतिनिकेतनमध्ये एक वर्षभर होते. कोणत्याही फिल्म इन्स्टिटयूट किंवा इतर संस्थेत त्यांनी नटाचे शिक्षण घेतले नव्हते. असे असूनसुद्धा इतकी परिपूर्ण भूमिका वठवायला ते शिकले कुठे ? मला वाटते जगाच्या विशाल पाठशालेतच ते शेवटपर्यंत धडे शिकत राहिले. मानवी स्वभावाचे विविध पैलू, त्यांच्या लकबी व कपडयातील विविध फॅशनन्सचा त्यांनी निरीक्षण करून अभ्यास केला. गांधीजींच्या वर्धा येथील आश्रमात सुद्धा ते काही काळपर्यंत होते. दुसऱ्या महायुद्धात ते लंडन येथे होते. BBC वरून ते नाटक, बातम्या व परिसंवाद देत असत. कम्युनिझम्-मार्क्सिझम्‌चा किडा त्यांना लंडनच्या स्वच्छ व स्वतंत्र परिसरातच चावला. कृष्णमेननलाही मार्क्सिस्ट–कम्यु–निस्ट–बगने तेथेच चावा घेतला होता.

'दो बिघा जमीन' मध्ये एका माणसाची जमीन एका सावकाराकडे गहाण टाकलेली असते. ती परत मिळवायला हा माणूस कलकत्त्यामध्ये रिक्षा चालवतो. ही भूमिका वठवण्यासाठी बलराज सहानी रिक्षेवाल्यांच्या झोपडपट्टीमध्ये पुष्कळ आठवडे राहिले होते. त्यांचे बारकाईने निरीक्षण केले होते.

'धर्ती के लाल' मध्ये सुद्धा दुष्काळातील भुकेला, अन्नवस्त्राला महाग–मोताद झालेला भणंग, कंगाल व कसलाही आधार नसलेल्या शेतकऱ्याची भूमिका करण्यासाठी बलराज सहानी कित्येक महिने एकदाच जेवण करीत असत. हुबेहुब असर यावा यासाठी ते अंगाला चिखलाचा द्रव लावीत असत.

श्री. बलराज सहानी हे दोन आठवडे पाकिस्तानमध्ये होते. त्या वेळी त्यांनी एक रोजनिशी लिहिली होती. दोन्ही देशांच्या दृष्टिकोनातून ती इतकी nostalgic होती की ती हिंदु-मुस्लिमांना एकदम पसंत पडली.

या पुस्तकात बलराज सहानी यांनी काही काही बाबतीत हात आखडून लिहिले आहे. दमयंती ही बलराज सहानी यांची पहिली पत्नी होती. तिच्या मृत्यूविषयी सहानींनी इतक्या त्रोटकपणे लिहिले आहे, की आपल्याला शंका-कुशंका याव्यात. दिलीपकुमार-कामिनी कौशल प्रकरणावरून युसुफ खान व बलराज सहानी यांच्या कुटुंबात गैरसमज निर्माण झाला होता. या प्रकरणाविषयीसुद्धा बलराज सहानींनी अळीमिळी गुपचिळी बाळगली आहे.

एकदा आचार्य अत्रे म्हणाले होते की, सिनेमाचा उद्योगच असा आहे की, खुद्द हरिश्चंद्र व तारामती या धंद्यात शिरले असते तरी बोल बोल म्हणता त्यांच्या सद्‌गुणांचे मातेरे झाले असते. एकदा एक निर्माता मीनाकुमारीशी सलगी करायला लागला तेव्हा तिने त्याला झिडकारून लावले. तेव्हा त्या फिल्मनिर्मात्याने असा एक सीन त्या फिल्ममध्ये टाकून दिला की, त्यात हिरोने हिरॉइनला ( मीनाकुमारीला ) मुस्कुटात मारून द्यावी आणि हा सीन चांगला आला नाही असे खोटे म्हणून त्या निर्मात्याने त्याचे ३१ वेळा रीटेक घेतले. हिरोसुद्धा असाच एक मोठा अॅक्टर होता. त्यानेसुद्धा अगदी सहज-रीत्या ३१ वेळा बिचाऱ्या मीनाकुमारीला गालफडात हाणल्या ! असल्या दुनियेत या प्रिन्सिपल्ड व टॅलेन्टेड माणसांनी जवळजवळ तीस वर्षे काढली. सतत तीन दशके या घाणीत काम करून त्याचे शिंतोडेही त्यांच्यावर उडाले नाहीत.

बलराज सहानी खचले ते त्यांच्या तुरुंग-वासानंतर. काही लोक त्यांना देशद्रोही म्हणाले. ज्या देशाबद्दल त्यांना एवढी आपुलकी होती तिथल्या लोकांनीच त्याला स्वधर्मत्यागी ठरवले !

आमच्या वाचनालयासाठी परवा मी फिरोझ रंगूनवालांचे 'A Pictorial History of Indian Cinema' हे पुस्तक घेतले. त्यात जो बलराज सहानींचा छोटा फोटो आहे असा सुंदर फोटो दुसऱ्या कोणत्याच पुस्तकात नाही.

नलिनी जयवंत व तिचा नवरा वीरेंद्र यांचा माटुंग्यामध्ये एक छोटा फ्लॅट होता. तेथे बलराज सहानी नेहमी जात असत. त्या वेळी नलिनी जयवंत फारशी प्रकाशझोतात आली नव्हती. ती स्वतः स्वयंपाक करीत असे व नवराबायको एकाच पानातून जेवत असत. हे समाधानाचे दृश्य पाहून बलराज सहानी फार सुखावत असत. नलिनी जयवंत प्रकाशझोतात आली मात्र व या दोघांनी चेंबूरमध्ये एक भव्य बंगला खरेदी केला. बंगला सजवण्यासाठी नलिनी – वीरेंद्रनी अफाट पैसा खर्च केला. या इथपासून The Imp and the Crust या टॉलस्टायच्या गोष्टीची पुनरावृत्ती झाली. वीरेंद्र व्यसनाच्या आहारी गेला व त्यातच गेला !

मुळात बलराज सहानी यांनी हे पुस्तक हिंदीत लिहिले आहे. इंग्रजी भाषांतर दिल्ली-मधील श्री. रमेश देशपांडे यांनी केले आहे. त्यांनी भाषांतर चांगले केले आहे. फिरोझ रंगूनवालाच्या पुस्तकातील सिनेमाचे फोटो नुकतेच पाहिल्यामुळे या पुस्तकातील फोटो मद्यानंतर पाण्यासारखे वाटले !

– जें. एन्. पोंडा


## नवीन दाखल झालेली पुस्तके

1. **The Collapsing Universe :** Extraordinary new findings on the Birth – And Death of the Cosmos) : Isaac Asimor. $ 2.25
2. **UFO :** (UFOLOGY) : Robert Chapman. 95 p.
3. **Chesapeake :** (Bestseller–Novel) James A Michener. £ 2.25
4. **Final Payment :** (Bestseller–Novel) Mary Gordon £ 1.00
5. **Bright Flows The River :** (Bestseller–Novel) Taylor Caldwell. £ 4.25
6. **The Big Biazarro :** Leonond Wise. 95 p.
7. **Capitalism** –(Nonfiction) : Ayn Rand–

* पेट्रोल आणखीन महागणार, रॉकेलला रांगा, गॅसला उशीर, ओनरशीप फ्लॅटचे भाव उत्तुंग शिखरावर, १९८२ पासून ग्रहांची वेगळी स्थिती वगैरे अनेक कटकटी विसरण्याचा एकच रामबाण उपाय ! पुस्तकात डोके खुपसा ! नुसत्या पुस्तकात नव्हे !! 'फिनिक्स' च्याच पुस्तकात !!!

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव, पुणे ३०**



१८ वा महाराष्ट्र राज्य तमाशामहोत्सव, नाशिक येथे २१ ते २४ फेब्रु. ' पार पडला....! ' त्यानिमित्ताने एक सामाजिक टिपण

# दिलवरा, विचार तुम्ही हो करा....

**प्रा. गोपाल दत्त कुलकर्णी, नाशिक**

लावणीच्या एका संग्रहाचे शीर्षक ' अंधारातल्या लावण्या ' असे आहे. वास्तविक सर्वच लावण्या रातराणीसारख्या रात्री फुलणाऱ्या गुलबकावली आहेत. सध्या साहित्य-सम्मेलन, मराठी नाट्यसंमेलनाचा हिरकमहोत्सव गाजत आहेत, त्या तुलनेत नाशकात पार पडलेला १८ वा तमाशा महोत्सव चार दिवस-रात्री जागवून संपला; पण गाजला बिलकूल नाही. म. रा. सांस्कृतिक कार्य संचालनालयातर्फे गेली १७ वर्षे हा महोत्सव चालू असावा असे दिसते. कारण हा अठरावा होता. तमाशामहोत्सवाचे आयोजन करताना गलथानपणा घडल्याचे, गटणेसाहेबांनी वार्ताहरपरिषदेत कबूल केले. शासनाची उद्दिष्टे निष्फळ ठरत असल्याचेही त्यांनी मान्य केले. (दै. देशदूत २४।२।८०). शासन किंवा उच्च समाज जसा अनेक गफलतींबाबत गुडी-गुडी शब्दात डिफेन्सिव्ह असतो, असेच होते साहेबांचे बोलणे. दोष बिलकुल त्यांचा नव्हता. कारण या तमाशामहोत्सवाला ' स्ट्रक्चर ' नाही, तेव्हा अपेक्षित ' फंक्शन ', कसे साधणार ? कुणावरही टीका अभिप्रेत नाही, फक्त हे कुठवर चालणार एवढाच प्रश्न आहे.

माझ्या मते तमाशामहोत्सवाकडे जे भयाण दुर्लक्ष होते ( फक्त रात्रीची गर्दी वगळता ! )याची कारणे अशी :१ तमाशा हा अजून फारसा प्रतिष्ठित नाही. त्याचे ' हायब्रीड 'अक्करमासे प्रसार ' वगनाट्य '–'लोकनाट्य' जरी थोडेफार प्रतिष्ठित असले तरीही.

२. तमासगीर मंडळी नाटक-सिनेमावाल्यांप्रमाणे लब्धप्रतिष्ठित व वाचाळ नाहीत. कारण ते शिक्षित व पैसेवाले नाहीत.

३. तमासगिरात स्त्रियांचा भरणा प्रमुख असल्याने पुरुषी ढोंग व अहंकार त्यांच्याकडे तुच्छतेने पाहण्यात व्यक्त होतो. रात्रीची ओळख सकाळी दाखविण्याची गरज नाही.

४. तमाशात आजही, अजूनही दलित जातींच्या कलावंतांची बहुसंख्या असल्याने, एकूण दलितांकडे पाहण्याचा जो परंपरागत दृष्टिकोन आहे, तो इथेही दिसतो.

५. दलित संघटनातील जातीय दृष्टिकोनामुळे, अतिशूद्र जातींचा विचार करण्यास लढाऊ दलित संघटनांना वेळ नसावा.

६. तमाशातील महिला कलावंत बऱ्याच वेळा कुणा मालदाराच्या ' रखेल ' असल्या तर त्यांची संतती बिनजातीची ठरण्याची अधिक शक्यता असते. तेव्हा जाती नष्ट करण्याची बंडखोर बांग देणाऱ्यांना, बिन-जातीच्या व्यक्तींचा विचार करण्याची गरज वाटत नसावी.

७. महाराष्ट्रातील सुमारे ४०० तमाशा-फडांपैकी दहा टक्के फड–पार्टर्या ( उदा. विठाभाऊ बापू मांग, रोशन सातारकर, दादू इंदूरकर वगैरे ) वगळता कुणाचेही बूड स्थिर नसल्याचे या रानपाखरांना एका ठिकाणी राहून, संघटना बांधून आवाज उठविणे कठीण जात असावे.

८. अनुसूचित जाती-जमातींसाठी जे घटनात्मक आरक्षण आहे त्याचा लाभ घेण्याची क्षमता सालोसाल भटकणाऱ्या तमासगिरांना कुठून येणार ? तेव्हा तमासगीर स्थिर होत नाहीत, संघटित होत नाहीत, हे दलितांपैकीही विशिष्ट हितसंबंधांना पोषकच आहे.

९. तमासगीर स्त्रियांची कलाच नव्हे तर देहही स्वस्तात उपभोगता येतात, ही भावना समाजात एवढी पक्की आहे की, त्यांना सहाय्य करणे म्हणजे एका मोठ्या करमणुकीला मुकणे ठरणार असल्याने, संपूर्ण समाज असाच हितसंबंधी उदासीन राहणार आहे.

१०. तमाशातील ठेकेदार मंडळी एका पार्टीला एका रात्रीसाठी विशिष्ट सालासाठी फक्त रु १०–१५ देतात. साधारण मॅन अवर्सचा विचार केला तर फडातील प्रत्येकाला तासदीड तासाच्या अंगमेहनतीसाठी दरडोई एक रुपया पडतो. त्यातून दौलतजादा हा प्रकार निर्माण होतो. तोही ५–५० रुपयांपेक्षा अधिक नसतो. म्हणजे या कलावंतांना रोज ३ ते १० रुपयांपेक्षा अधिक कमाई नाही. तेव्हा बऱ्याच कलावंती देहविक्रय करीत असतील तर त्यांना नावे ठेवण्यात हशील नाही. शासन जोवर सामाजिक जाणीव सुधारत नाही तोवर शासन ' थेटरवाले ' व ठेकेदार यांचेविरुद्ध काही करू शकत नाही.

११ : तमाशातील नाच पाहण्यासाठी येणाऱ्यात बहुसंख्य प्रेक्षक गरीब वर्गातले व उच्चशिक्षित नसलेले असतात. त्यांच्या दृष्टीने नाच–गाणी हा प्रकार कपडे घालून केलेला ' कॅबेरेच ' असतो.

१२ : ग्रामीण प्रेक्षकात तमाशा प्रचंड लोकप्रिय असूनही, ऊठसूठ ग्रामीण महाराष्ट्राच्या नावाने गहिवरणाऱ्यांना ही करमणूक ' सकस ' व ती करणारे प्रतिष्ठेने जगतात की नाही याचीही फिकीर करावीशी वाटत नाही.

## ' शहरवासीयांना नो अपील '

१३ : शहरवासी जे तमाशाला गर्दी करसात तोदेखील एक त्यांची जिभेवरची बाभळी घालविण्याचा प्रकार आहे. ते चवपालट म्हणून येतात. ही मंडळी वग 'एन्जॉय' करत नाहीत. ताई–भाऊ, हिंसा व सेक्सला चटावलेल्यांना तमाशातील नाट्याचे ' अपील ' नाही. संगीतबारी, द्व्यर्थी कोट्या अश्लील हावभाव, स्त्रीशरीराचे दिलखेचक

कंगोरे व हालचाली याविषयींच्या त्यांच्या विकारांचे 'विरेचन' करण्यासाठी ही भाऊगर्दी असते. एकूण ही मंडळी गाजरपारखी आहे. त्याचप्रमाणे जुन्या अस्सल लावण्या कुणी गायल्या–नाचल्या तरी शहरवासीयांना त्याचे 'मर्म' जाणता येत नाही. त्यामुळे तमाशाच्या 'फॉर्म'कडे दुर्लक्ष झाले आहे व नाच-गाण्यात सिनेमा शिरला आहे. श्रीमती रोशन सातारकरांच्या संगीत जलशात १४–१५ वर्षांचा मुलगा एक पाश्चात्य वाद्य ठेक्यात वाजवीत होता.

१४ : आधुनिकता किंवा सुधारणेच्या नावाखाली जसे भारतीय विवाहात बिनबुडाचे रिसेप्शन शिरले, तसेच तमाशाचे चित्रपटीकरण झाले आहे. दोष पुन्हा प्रेक्षक-रसिकांचाच आहे.

१५ : तमाशाविषयी I. N. T. सारखी खासगी संस्था ऐच्छिक संशोधनकार्य करते, तसे शासनाला किंवा विद्यापीठांना का करता येत नाही, कळत नाही. तमाशावर डझनाने डॉक्टर होऊ शकतील.

१६ : तमाशाफडांचे परस्पर संबंध अतिशय स्पर्धात्मक व संघर्षात्मक स्वरूपाचे असल्याने, तमासगीरमंडळी एकमुखाने आवाज उठविणे कठीण आहे.

१७ : नाट्यक्षेत्रात ज्याप्रमाणे काही संस्था–कलावंत व व्यक्ती कारणाने व काळमहात्म्याने 'छब्बू' होऊन बसल्या आहेत, तोच प्रकार तमासगिरातही आहे. तोही अधिक 'क्रूड' (crude) प्रमाणात.

१८ : या तमासगिरांचे जीवन तर 'निशाचर' आहेच; परंतु त्यांची मुले–बाळे अर्भकावस्थेपासून अशा उत्तेजक पर्यावरणाला सरावत जात असल्याने (Expose) शिक्षण, नियमित स्थिर जीवन या समस्या त्यांच्या गावीही असणे शक्य नाही.

१९ : अन्यायाविरुद्ध उठण्यासाठी एक म्हणजे प्रखर न्यायनिष्ठ व सत्यप्रेरित नेतृत्व हवे. अन्यायाविरुद्ध जळजळीत जाणीव हवी. तमासगीर समाजात दोन्हींचा अभाव दिसतो.

२० : वास्तविक पूर्वपेशवाईत उदय झालेला व उत्तरपेशवाईत मराठेशाहीबरोबर अस्तंगत झालेला तमाशा हा तसा decadent (डिकेडंट) 'नष्ट' प्रकार आहे. पेशवाई लुप्त झाल्यावर त्याची खरी राजप्रतिष्ठा गेली; तेव्हाच तो विलयाला जाता, तर बरे होते. पठ्ठे बापूरावांनंतर रामजोशी, सगनभाऊ, होनाजी बाळा यांच्या उंचीचा पूर्ण तमासगीर शाहीर महाराष्ट्रात झाला नाही!

२१ : तमाशा फारसी शब्द आहे. तो कशाचाही अपभ्रंश नाही. शाहीर हा पुन्हा शायरचा (फारसी) चा अपभ्रंश आहे. मराठ्यांच्या (महाराष्ट्राच्या) अस्सल कलेला परकीय नावे मूळ परकी अर्थानेच का रूढ झाली, तेव्हा असा कलाप्रकार इतरत्र कुठे होता का व आहे का, याचेही संशोधन व्हावे. (नसण्याचीच खात्री अधिक वाटते.)

२२ : तमासगीरांना सामाजिक प्रतिष्ठा का नाही? वय झालेल्या नाच्या-बायांचे जीवन अखंड हलाखीची कुत्तरकहाणी आहे. वेश्येप्रमाणे त्यांची समस्या कोरडी दया दाखवून सुटणार नाही.

२३ : 'दे दान सुटे गिराण' विरुद्ध जशी बंदी आली, तशी दलित समाजातील जाणीव असणाऱ्या नेत्यांनी तमाशात नाचण्यावर बंदी घालण्याची वेळ लवकरच यावी, म्हणजे ४–२ रुपयांत मजा मारू पाहणाऱ्या गुलछबूंचे डोळे उघडतील. पण ते होणार नाही. पुण्यातील घरगडी स्त्रियांचा संघ यशस्वी होऊ शकेल. कारण त्यांची गरज रोजचीच आहे म्हणून नागरिकांचे डोळे उघडतात. तमाशामुळे अशी कोणती नित्याची गरज भागते? ही अडचण त्यांची स्थिती सुधारण्याच्या मार्गातील अडचण आहे. तमासगीर हा या अर्थाने समाजाच्या काठावरचा समाज आहे. एकसंघ भाग नव्हे; तर हवा असून नकोसा!

२४ : बहुसंख्य तमासगीर ग्रामीण महाराष्ट्रात वावरत असल्याने त्यांना राजघटनेने दिलेले मूलभूत हक्क, सामाजिक न्याय या स्वर्गीय (?) सुविधांचा तर पत्ताच नाही; पण शासनाच्या मर्त्य दूतांच्या (पोलीस व इतर 'खाती') आणि कायदे-कानूंचा व सेवांचाही त्यांना लाभ होत नाही. तेव्हा कोल्हाटी, डोंबारी यांच्या जवान पोरी तमाशानंतर रात्रभर कुणी पळवून नेल्या तरी आसपास 'कायद्याचे राज्य' उपलब्ध नसते. तसेच गावगुंड व नगरगुंड यांचेविरुद्ध आवाज केला तर आपल्याच भाकरीशी वैरभाव केल्यासारखे ठरते व त्या तमासगीरांना ते गाव कायमचे टॅबू (वर्ज्य) ठरते.

२५ : ज्या प्रमाणे विद्यापीठे, मंत्रालये, शहरात असतात. त्याचप्रमाणे तमाशापरिषदादेखील शहरातच ऑफिसे थाटण्यात समाधान मानतात, कारण काही न करता काही केल्याचा कांगावखोर दावा शहरात चांगला साधतो.

## सामुदायिक भावनेचा अभाव

२६ : महाराष्ट्रातील ४००-५०० तमाशेफड कधीच एकत्र येत नाहीत. नंदीवाले वर्षातून एकदा तरी पंढरपूरजवळ कुठे तरी जमतात व समुदायाच्या प्रश्नांची देवाण-घेवाण, सोडवणूक करतात. महोत्सवात चार दिवसात फार तर १५–१६ फड येतात. तेही आपापले 'प्रोग्राम' किंवा 'नाइट' झाली की पसार! चर्चा, परिसंवाद, परिचर्चा नसल्याने, उकल राहो, समस्यांची बातचीतही होत नाही किंवा तमासगिरात स्नेहभाव निर्माण होत नाही.

२७ : तमासगिरांचे जीवन रात्री उगवत असल्याने व्यसनासक्ती, अनियमितपणा, कुपोषण, अनारोग्य आदी समस्या निर्माण होतात, वाईट सवयी वाढतात याची जाण तमासगिरांना नाही, तिथे समाजाला त्याचे काय सोयरसुतक?

२८ : नटी, (सिनेमा, नाटक व तमाशा) देवदासी व मुरळ्या, कॉलगर्ल्स व राजरोस देहविक्रेत्या वेश्या यांच्यातील गुणात्मक व संख्यात्मक फरकावर–आर्थिक, लैंगिक, मानसिक व इतर– अभ्यासपूर्ण शोधन व्हावे.

२९ : तमाशाचा नित्य संबंध शासकीय व्यक्तीपेक्षा समाजातील सर्वसामान्य व्यक्तींशी येतो. तेव्हा सर्वसाधारण पुरुषांच्या तमाशाबद्दलच्या प्रतिक्रिया व उदासीनता अभ्यास करण्यासारख्या ठरतील.

३० : तमाशाव्यवसाय ज्या दुष्ट वर्तुळात रात्ररात्र फिरतो ते वर्तुळ पूर्णतः भेदता आले नाही तरी त्यांची गिरकी थोडीफार कमी करता आली तर भोवंड आलेले तमाशाकलावंत मानवी जीवन जगू तरी शकतील.

तमाशाला लोकप्रियता दिसत असली तरी तीत तुच्छता भरपूर मिसळलेली आहे. ही तुच्छता उच्च जातींना (तथाकथित) 'हलक्या जातीविषयी वाटणारी तुच्छता तर नाही? कारण नावापुरता ज्यात तमाशा आहे अशी चित्रपटातून व 'एक तमाशा सुंदरसा 'सारख्या भगिनीसाठी उच्च जातीय

नट–नटचा सहज उपलब्ध होतात व ते तमाशे 'खरे' नमूनही पेपरवाले त्यांना गाजवितात.

: जवळजवळ सर्व वर्तमानपत्रांत चित्रपट व नाटच परीक्षणे नियमित प्रसिद्ध होतात, ते भाग्य तमाशांना का नाही? की वर्तमान-पत्र वाचणाऱ्या वाचकांना 'उघडपणे' तमाशा परीक्षणे वाचणे देखील सोसणार नाही? जर कला–परीक्षक तक्रार करतील तमाशे तेच तेच असतात, तर मग अमिताभ बच्चनचे असंख्य सिनेमा काय महाकाव्याचे सर्ग असतात की, जी. एं–चे कथासंग्रह असतात?

: चित्रपटगृहे व नाटचगृहे जेवढी आलि-यान तेवढीच तमाशागृहे टुकार! ही स्थिती तमाशा व 'खरे' तमाशाप्रिय कामगार–गरीब यांचेविषयी असणारी मध्यमवर्गीय उपेक्षा, उच्च उदासीनतेतून उत्पन्न होत नाही का?

: तमाशा कलावंतासाठी –म्हणजे प्रशि-क्षणासाठी इच्छुकासाठी शासनाने एखादी अकादमी (शाळा) काढून तमाशा शिक्षणा, बाहेर इतर शिक्षण व व्यवहार तमाशा शिक्ष-णेच्छु तरुण-तरुणीसाठी काढण्याचा प्रयोग करण्यासारखा आहे. मात्र ते पुणे-मुंबई येथे नको नारायणगावला व कोलापूरला चालेल.

: ढोंगी नीती–कल्पनांचा आणखी एक नमुना विचारात घेण्यासारखा आहे. तमाशा चित्रपटात कोणत्याही उच्च जातीतील पुरुष व स्त्रियाही भूमिका करण्यास तयार असतात मात्र स्टेजवर तमाशा करण्यात त्यांची जात व (मर्यादित) कला आड येत असावी. तमाशा कलावंत हरहुन्नरी असावा लागतो. तमाशातील हजरजबाबीपणा, चपळ हाल-चाली, गाणे बजावणे यासाठी प्लेबॅक वाप-रता येत नाही. शिवाय पैसेही कमी मिळ-तात, ही गोष्ट निराळी.

: तमाशा चित्रपटात त्यांचा त्या चेहऱ्यांचा व त्याच त्या मेकअपमुळे चिरयौवना दिस-णाऱ्या चेहऱ्यांचा चित्रपट निर्मात्यांना कंटाळा येत नाही, कारण इथेही बरेच आर्थिक व शारीरिक हितसंबंध आड येत असावे.

## इ. स. २०५०

महाराष्ट्रातील कुस्ती, पोवाडे, व तमाशा या गोष्टी लवकर नाही तरी उशिरात उशीरा इ. स. २०५० पर्यंत, नष्ट होऊन महाराष्ट्र जयजगत संस्कृतीचा–कॉस्मॉपॉलिटन-(वाईट अर्थाने) होईल, अस्मितेच्या अर्थात लोककला टिकविणेही येते, याचा विसर समाजधुरि-णांनी तरी पडू देऊ नये.

: मृत, निर्जीव वस्तूंची संग्रहालये तयार करण्यात जेवढा रस घेतला जातो. (का? कारण परदेशातही 'क्युरिओंचे जतन' ही फॅशन आहे म्हणून?) त्याप्रमाणे जुन्या तमाशा कलावंतांची अवजारे, पत्रव्यवहार, वाचे यांचा संग्रह का उभारला जाऊ नये?

: वेद मंत्र मूळ उच्चारात टिकावेत म्हणून जसा टेप्सचा आटापिटा, तसाच आटापिटा जुन्या लावण्या स्वरोच्चारांत (चालीत) टिकविण्यासाठी शासनाने करावा. सांस्कृतिक गाठीभेटीसाठी जे कलावंत परदेश यात्रा करतात त्यात तमासगीरही असावेत. एखादा अस्सल तमाशा परदेश दौऱ्यावर का जाऊ नये?

४० : तमासगीर कलावंत काही वेळा बंदिस्त नाटचगृहात, माईकसमोर 'फेल' जातात, तेव्हा नवीन तंत्राचे ज्ञान त्यांना पद्धतशीरपणे दिले जावे. कारण एखाद्या रोशनबाई सातारकरच्या गाण्यासाठीच सर्रास जीव टाकतात. तमाशा कलावंताना वर्षाकाठी एखादा तरी बहुमान का मिळू नये? पद्मश्रीसाठी विशिष्ट वर्गाच्या पाठि-ब्याची गरज भासू नये. तमाशा कलावंत राज्यस्पर्धेला घाबरतात, प्रादेशिक किंवा जिल्हापातळीवर स्पर्धा नको म्हणतात. कारण ज्यांना पहिले-दुसरे क्रमांक मिळत नाहीत. त्यांची लोकमान्यता आणखीच घसरण्याची सकारण भीती असते. शिवाय बक्षिसातले राजकारण वेगळेच.

योगायोगाने म्हणा की जाणून म्हणा मी चाळीस कलमी विचार-योजना सादर केली आहे. तिचा तमासगीर, तमाशाप्रिय मंडळी निदान शासकीय अधिकारी मग शेवटी आपण सर्वांनी विचार करावा, या आशेने हे लिहिले आहे.

## चार रात्री

नाशिकच्या अठराव्या महोत्सवाचा नेह-मीचा 'लघळ' अहवाल मी जाणूनबुजून टाळला आहे. चार दिवस रोज ३ प्रमाणेसंगीत बाऱ्या व ३-४ वग खेळले गेले. विठा भाऊ-बापू, नीला जळगावकर, रोशन सातारकर अशा अनेक 'गावकरांचे' रसिकांनी जोरदार स्वागत केले. तमासगीर बायांची ही 'कर' वाली आडनावे का असतात? त्यामुळे जातीचे लफडे उभे राहत नाही का? पारशी परदेशातून आले म्हणून धंदा वा गावापुढे 'वाला' लावून सुटले, ह्या बिचाऱ्या 'देशी' असून 'परदेशी!' म्हणून 'कर' का? की यांचे 'कर' राजरोसपणे विवाह करून हाती घेण्यास पुरुष कुरकुरतात म्हणून? बहुतेक रोज संगीत बाऱ्यात १-२ तरी सिनेमातली गाणी गायली-नाचली जात. याचेही कारण असे असू शकते की, पूर्वी-प्रमाणे आजचे रामजोशी, होनाजी व बापूराव तमाशासाठी लावण्या लिहीत नाहीत. रोशन सातारकरांची बारी होती त्यादिवशी तर तिकिटांसाठी मारामाऱ्या होऊन, बुकिंग विंडोच्या काचा फुटल्या! (रसिकहो, काही परकीय, अन्सेन्सॉर्ड चित्रपटांचा महोत्सव नव्हता!) मात्र हेच गर्दीखोर 'वग' नको, नाच-गाणी हवीत म्हणून धुडगूस घालत होते. तमाशा म्हणजे नाच-गाणी झाल्याने तमाशा काही फार वर्षे टिकणार नाही.

मी रोशनबाई सातारकरांना भेटलो. एवढी प्रतिलता म्हणण्यात येणारी बाई, एका कळकट, जमिनीवर पाणी वगैरे सांडलेल्या खोलीत, तंबाखूच्या मशेरीच्या वासात उभी होती. तमाशावाल्यांच्या बरोबर पोरे-बाळे होती व ती सर्व बाळ-गोपाळ मंडळी सरा-ईताप्रमाणे स्टेजवर आईबापामागे फिरत होती. रोशनबाई व त्यांची कन्या (बहुतेक कन्याच असावी) सुरेख, लयीत गोड नखरे-बाज गायल्या. 'येऊ अशी कशी (असी-कसी) मी नांदायला'च्या वेळी पब्लिकने थेटर डोक्यावर घेतले होते. विठाबाई जर इंग्रजी बिंग्रजी शिकल्या असत्या तर, त्यांनी उषा अय्यर सारख्यांची छुट्टी केली असती. सारे 'थेटर' त्यांनी मुठीत नव्हे चिमटीत ठेवले होते! पांडुरंग घोटकर देखणा नट आहे. हजरजबाबीपणा, गावरान भाषा, ढोलकी-तबला, गाणे...त्याला काय येत नाही? दादा कोंडके किंवा अनंत माने यासारख्यांनी त्याला घेतले तर सिनेमा गाजवेल तो. तमाशात ही सर्कसप्रमाणे समई-नृत्य नावाचा प्रकार आला आहे. किती तरी कलावती इतक्या रेखीव नाचल्या व शोभल्या की दिल लट्टू व्हावे. दिवसा कळाहिन दिसणाऱ्या या बाया एवढ्या चैतन्याने स्टेजवर कशा काय फुलतात, पेटतात! ही चंद्रकमळे आहेत की, हा त्यांच्या कलेचा करिष्मा की ओढून आणलेले उसने चंद्रबळ? संगीत बाऱ्यांचे वेळी जे उत्साहाचे उधाण दिसे ते ढोलकी, फड व वगाचे वेळी ओहोटीस लागे. तमाशा महो-त्सवाचे निमित्ताने 'माझ्यासारख्यांना' ४ दिवस राजरोस तमाशे पाहता आले, तमाशे-वाल्यांची व पाहणाऱ्यांचीही करमणूक झाली, मात्र या कलेला काय लाभले व किती गती मिळाली, तर त्याचे उत्तर 'काही नाही' असे द्यावे लागेल. महोत्सव ठाकठीक झाला; पण त्या तमाशाचे काय? 'नाच-तमाशे' हा शब्द 'नाचत माशे' असा विनोद सोंगाडे मंडळी करतात; पण 'नाचणारे माशे' तडफडत असतात, हे जावे त्यांच्या वंशा तेव्हाच कळे! □

# चित्रपट

सदानंद बोरसे

# सिंहासन

## छापील वर्तमानपत्री जिवंत खिळयांतून अनुभूतीच्या पातळीवर आलेले सत्ताकारण

अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन' या दोन अतिशय गाजलेल्या कादंबऱ्यांमधील निवडक प्रसंगांवर आधारित 'सिंहासन' हा चित्रपट प्रदर्शित झाला. चित्रपटाचे दिग्दर्शक आहेत डॉ. जब्बार पटेल. पटकथा व संवाद विजय तेंडुलकरांचे. या चित्रपटात कलाकारांच्या यादीत अरुण सरनाईक (मुख्यमंत्री जिवाजीराव शिंदे), डॉ. श्रीराम लागू (अर्थमंत्री विश्वासराव दाभाडे), दत्ता भट (कृषिमंत्री माणिकराव पाटील), मधुकर तोरडमल (महसूलमंत्री दत्ताजी जाधव), श्रीकांत मोघे (राज्यमंत्री आनंदराव टोपले), मोहन आगाशे (बुधाजी गोडघाटे), जयराम हर्डीकर (पानिटकर), नाना पाटेकर, माधव वाटवे आणि निळू फुले (पत्रकार दिगू टिपणीस) अशी बुलंद नावे आणि इतक्या प्रचंड संख्येने असल्यामुळे चित्रपटाबद्दल विलक्षण हवा होती. विषय, डॉ. जब्बार पटेल आणि कलाकार यांच्यामुळे चित्रपटाबद्दल खूप अपेक्षाही होत्या आणि 'सिंहासन' त्या अपेक्षा पूर्ण करून पसंतीला उतरला. आजच्या केवळ मराठीच नव्हे; तर हिंदी वा अन्य प्रादेशिक चित्रपटांमध्येसुद्धा 'सिंहासना'ची जागा केवळ वेगळेपणामुळे नाही; तर इतर अनेक गोष्टींमुळे अतिशय उंच ठरेल.

अरुण साधूंच्या कादंबऱ्यांवरून तो घेतला असला तरी एक स्वतंत्र कलाकृती म्हणून त्याचा विचार करावा, असे दिग्दर्शक जब्बार पटेल यांनी एका मुलाखतीत सांगितल्याचे वाचले. त्यांची ही अपेक्षा रास्त आहे. हे मान्य करूनही या दोन्ही वा त्यांपैकी एक कादंबरी ज्यांच्या वाचण्यात आल्या/आली आहे त्यांच्या डोक्यात नकळत तुलना होणारच. अशी तुलना झाल्याने 'सिंहासन' चित्रपटाला काही बाध येतो, असे मला वाटले नाही. उलट काही वेळा तर चित्रपट त्याच्या मर्यादांसकट आणि कादंबरीचा आवाका मान्य करूनही आपल्या दृश्य व श्राव्य परिणामांमुळे कादंबरीवर मात करून जातो.

'सिंहासन'विषयी अधिक लिहिण्यापूर्वीच एक स्पष्ट करतो की, दोन कादंबऱ्यांच्या प्रसंगांची घातलेली सुरेख सांगड, काही चांगले व काही वाईट बदल आणि कादंबऱ्या व चित्रपट यांचे हेतू (अर्थातच प्रेक्षक म्हणून मला वाटलेले, जाणवलेले—हेतूपेक्षाही त्याला माझे interpretation वा त्या कलाकृतींमुळे मनात उठलेले विचारतरंग म्हणणे जास्त योग्य) या सगळ्यांचीच एक चमत्कारिक सरमिसळ माझ्या डोक्यात झाली असल्याने त्याबद्दल हवाबंद कप्पे पाहून मुद्देसूद लिहिणे जरा जड जात आहे; त्याबद्दल मी आधीच दिलगिरी व्यक्त करतो.

'मुंबई दिनांक'मधून आपल्या डोळ्यांसमोर उभा राहतो तो मुंबईतील एक प्रातिनिधिक दिवस. दिवसभरात घडणाऱ्या घटनांचे स्थळ-काळ—व्यक्तींप्रमाणे संदर्भ बदलतील, अर्थ बदलतील; पण घटनांचा छाप तोच आणि हा दिवस आपल्यापुढे उजाडतो आणि मावळतो तो वेगवेगळ्या व्यक्तिरेखांच्या नानाविध पैलूंवर प्रकाश टाकत. या व्यक्ती वेगवेगळ्या थरांतील आहेत, त्यांच्या स्वभावांचे पदर विणणाऱ्या धाग्यांचे सूत, रंग, वीणही वेगवेगळी आहे; पण जमीन—अस्मानाची तफावत असणाऱ्या या व्यक्तींचे संबंध एकमेकांत गुंतलेले आहेत, या संबंधांच्या गाठी काही साध्या सरकगाठी, काही निरगाठी, काही रेशमीसुद्धा. एका दिवसाच्या निमित्ताने अय्यर (पत्रकार), किशोर वझे (तरुण कारकून), पानिटकर (स्मगलर), डी—कास्टा (कामगार-पुढारी) आणि जिवाजीराव शिंदे (मुख्यमंत्री) या पाच प्रमुख आणि त्या अनुषंगाने येणाऱ्या अन्य अनेक व्यक्तिरेखा त्यांच्या अहंगंडासकट वा न्यूनगंडासकट वा अन्य वैशिष्ट्यांसकट ठसठशीतपणे उभ्या करणारी 'मुंबई दिनांक' ही कादंबरी. विषय व्यक्तिवैशिष्ट्यांचे रेखाटन व विश्लेषण या दृष्टीने 'मुंबई दिनांक'चा आवाका प्रचंड. आधी उल्लेख केलेल्या पाचही पात्रांची जीवने त्यांचे स्वतःचे प्रयत्न आणि परिस्थिती यामुळे कशी घडत गेली व बिघडत गेली हे दाखविणारा काळ व स्थळे या दृष्टीनेही 'मुंबई दिनांक'चा पसारा मोठा. राजकीय सत्ता हा विषय कादंबरीत येतो तो राजधानीच्या जीवनाचा एक महत्त्वाचा आणि अविभाज्य भाग म्हणूनच; तो विषय कादंबरीचा केंद्रबिंदू बनलेला नाही वा संपूर्ण कादंबरी व्यापून दशांगुळे उरत नाही.

याउलट सत्ता हा 'सिंहासन' कादंबरीचा मध्यवर्ती विषय. या कादंबरीतही व्यक्तिरेखा चितारल्या जातात; पण त्या उभ्या असतात सत्तेच्या पायावर. जीवनावर वा जीवनाच्या अन्य अंगांवर भाष्य होते तेही सत्तेच्या तुलनेसाठी. 'सिंहासन'मधील जवळजवळ प्रत्येक व्यक्तिरेखेजवळ एक

सिंहासन आहे. त्या व्यक्तीच्या सामाजिक स्थानाप्रमाणे तिच्याजवळ असलेल्या सिंहासनात फरक आहे. हा फरक म्हणजे लहान-मोठेपणा नाही. कारण सी. एम्.ना त्यांचे 'सी. एम्.' पदाचे सिंहासन जितके मोठे वा मोलाचे तितकेच देशमुखला आपला मंत्र्याच्या पर्सनल स्टाफचे पद महत्त्वाचे. यात केवळ पदरूप सिंहासनेच नाहीत तर कित्येकांची भावनारूप सिंहासने आहेत. उदाहरणार्थ – श्रीपतराव शिंदे. सत्ता लाथाडणारा, हट्टी, निर्लोभीपणा, आदर्शवाद इत्यादींचे त्यांनी आपले खास सिंहासनच बनवून टाकले आहे. काही जणांना सिंहासने मिळाली आहेत तर काही जणांचा त्यांच्यावर डोळा आहे. काही त्या सिंहासनांना जपतात, कारण त्यांचे अस्तित्वच त्यावर अवलंबून आहे तर काही-जण प्रसंगी आपल्या अस्तित्वाची किंमत देऊन आपल्या या सिंहासनांचे रक्षण करायला तयार आहेत. मुख्यमंत्रिपदाच्या सिंहासनासाठी चाललेल्या झगड्याच्या घटनेचे निमित्त करून वेगवेगळ्या सत्तावर्तुळाचे (मुख्यतः राजकीय सत्ता) दर्शन अरुण साधू घडवतात. ('सिंहासना'चे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यातील सर्वांत प्रमुख पात्र 'सी. एम्.' हे आपल्याला संपूर्ण कादंबरीत प्रत्यक्ष वा वेगळे क्वचितच भेटले. सी. एम्. आपल्यापुढे उभा राहतो तो मुख्यतः इतरांनी त्यांच्याबद्दल व्यक्त केलेल्या मतांमधून वा अप्रत्यक्ष भेटीमधून; पण तरीही मला असे वाटते की, हा सी. एम्. म्हणजे 'मुंबई दिनांक'मधील जिवाजीराव शिंदेच आहे.) तर सत्ता या जीवनाच्या एका अंगाचे बहुरंगी दर्शन घडविणारी 'सिंहासन' ही मुख्यतः घटनाप्रधान कादंबरी. या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये – विशेषतः 'सिंहासन'मध्ये राजकीय सत्ताधारी अर्थात लोकांनी, लोकांसाठी वगैरे वगैरे सरकार, अन्य लोकप्रतिनिधी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि या साऱ्यांनी बनलेले सत्तेचे वर्तुळ हे प्रत्यक्ष लोकांपासून किती लांब असते याचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष, अलिप्त वा कडवट उपहासाने भरलेले अनेक उल्लेख आहेत.

'सिंहासन' चित्रपटात केंद्रस्थानी घेतलेला विषय आहे राजकीय सत्ता. घटना आहे 'सिंहासन' कादंबरीतील मुख्यमंत्री विरुद्ध अर्थमंत्री यांचा मुख्यमंत्रिपदासाठी झगडा. मात्र संपूर्ण चित्रपटात जवळजवळ प्रत्येक प्रसंगामधून या राजकीय सत्तेची प्रत्यक्ष जीवनापासूनचा अविभाज्यता आणि तरीही आत्यंतिक निरर्थकता यांची प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष हेटाळणीच केलेली आहे. उदाहरणार्थ – १) दिगूची दाढी करणारा न्हावी त्याला राजकीय उलथापालथीवर विचारू व सुनावू लागतो तेव्हा दिगू त्याला ऐकवतो, 'शिंदे येवो नाही तर दाभाडे येवो; तुमच्या आयुष्यात काही फरक पडणार आहे का?' २) दिगूच्या वरती राहणाऱ्या वहिनी त्याला वर्तमानपत्रातून राजकीय समस्यांवर मजकूर खरडण्यापेक्षा 'नळाला न येणारे पाणी' अशा दैनंदिन समस्यांवर लिहायला सांगतात. ३) 'उषःकाल होत होता' या गीताच्या वेळी दाखवलेली दृश्ये. ४) शेवटी 'राजकीय स्थैर्यासाठी आम्हालाच मते द्या!' असे लिहिलेल्या भिंतीच्या आधारे खचत जाणारा वेडा दिगू.

'मुंबई दिनांक'मधील फक्त या सत्ताविषयाशी संबंधितच प्रसंग 'सिंहासन' चित्रपटात आले तेही त्यामुळेच. जिवाजीराव, डी–कास्टा संपूर्ण अवतरले, पानिटकर थोडा-फार, किशोर वझे मात्र संपूर्ण उडाला! चित्रपटाची पटकथा तयार करताना विजय तेंडुलकरांनी या दोन्ही कादंबऱ्यांचा सुरेख मेळ घातला आहे. विशेषतः मुख्यमंत्रिपदाच्या झगड्याचा शेवट करताना सी. एम्. चा आजार, पंतप्रधानांकडून झालेली विचारपूस, त्यामुळे पालटलेले वातावरण, सी. एम्. ची जीत आणि पराभूत माजी अर्थमंत्र्यांनी त्वरित नवीन लढ्यासाठी सुरू केलेली व्यूहरचना ही साखळी चित्रपटात अतिशय सुरेख साधलेली आहे. याउलट 'सिंहासन' कादंबरीत आधी सुमारे तीनशे पानात रंगविलेला झगडा जेमतेय तीस पानात घिसाडघाईने संपविल्यासारखा वाटतो. विजय तेंडुलकरांचे संवाद ही चित्रपटाची एक मोठी जमेची बाजू. दोन्ही कादंबऱ्यांमध्ये संवाद प्रवाही आहेत; पण तेंडुलकरांचे संवाद घटना वेगाने नेण्यासारखे गतिमान आहेत, प्रसंग रंगविण्यासारखे चपखल आहेत आणि प्रेक्षकांकडून ठायी ठायी दाद मिळविण्याइतके खटकेबाजही आहेत. कित्येक वेळा हे संवाद एखादी खवट मल्लीनाथी करून जातात; तर कित्येकदा एका वाक्यात एखादी ढंगदार व्यक्तिरेखा चितारून जातात. उदाहरणार्थ– १) पक्षाध्यक्ष शिवाजीराव राण्यांची स्वतःच्या पदाबद्दलची व्यथा– 'पक्षाध्यक्षपद म्हणजे शेरडीच्या शेपटासारखं असतंय. ना धड त्यानं माशा वारता येतात, ना धड लाज झाकता येते.' २) डी–कास्टा आणि विश्वासराव दाभाडे यांची जुगलबंदी. ३) राजकारणी लोकांबद्दल दिगू टिपणीसची टिप्पणी–'अहो, हे लोक परमेश्वरालासुद्धा खिशात टाकतील!' ४) विधानसभेतील सदस्यांची प्रश्नोत्तरे, विशेषतः काही भाषणे. ५) पत्रकार-परिषदांमधील प्रश्नोत्तरे अशी पोत्याने उदाहरणे देता येतील.

संवादाचा बुरूज तेंडुलकरांनी पक्का लढविला असला तरी पटकथा लिहिताना त्यांनी केलेले बरेच बदल–काही आवडले नाहीत, तर काही अनावश्यक वाटले. पटकथेमध्ये केलेले काही बदल मात्र निःसंशय कादंबरीपेक्षा अधिक चांगले व परिणाम वाढविणारे आहेत. आधी त्यांचाच उल्लेख करतो. १) आधीच उल्लेख केलेला शेवटचा मुद्दा. विशेषतः 'कादंबरीत झुंजीचा शेवट म्हणजे विश्वासराव दाभाड्यांचा राजकीय अंत' असे सूचित केले आहे; तर चित्रपटात ते पुन्हा नवीन झगड्याची तयारी करू लागतात, असे सूचित केले आहे, जे–विश्वासरावांचे आधीचे व्यक्तिरेखाटन व सामर्थ्य–यांचा विचार करता जास्त योग्य वाटते. २) अर्थमंत्र्यांचा पंजाबी सुनेला वा मॅडमना–महाराष्ट्रीय सूनबाई बनविणे. कादंबरीत पंजाबीपणाच्या स्पष्टीकरणाला असलेला वाव चित्रपटात मिळणे कठीण होते. असे छोटेमोठे अनेक बदल सांगता येतील, ज्यामुळे चित्रपटाची रंगत वाढली.

माझ्या मते काही अनावश्यक बदल ज्यामुळे चित्रपटाच्या चांगलेवाईटपणात काहीच फरक पडला नाही,–असे बदल अत्यंत किरकोळ आहेत–उदाहरणार्थ–'मुंबई दिनांक' मध्ये दयानंद पानिटकर डी–कास्टाला लिफ्ट देतो असा प्रसंग आहे. त्याऐवजी चित्रपटात डी–कास्टा पानिटकरला लिफ्ट देतो अशा बदलांचा आणखी उल्लेख करीत नाही.

चित्रपटात घटना व व्यक्तिचित्रणांच्या बाबतीत केलेले काही बदल मात्र विलक्षण खटकले.

१) कादंबरीत दिगू टिपणीस मुख्यमंत्र्यांना फोन करून अर्थमंत्र्यांचे बाबतीत सावधगिरीचा इशारा देतो. याउलट चित्रपटात एका अनामिकाचा मुख्यमंत्र्यांना फोन आल्याचे दाखविले आहे. 'हा अनामिक कोण?' असे शेवटपर्यंत न उकललेले रहस्य घेण्याची काही आवश्यकताच नव्हती.

२) डी–कास्टाला मिळविण्याची ईर्षा असलेली विनिता, त्याची भक्ती करणारी नीला ही कादंबरीतील वेगवेगळी पात्रे चित्रपटात कांतामध्ये एकत्र करणे ठीक

होते; पण कादंबरीत डी–कास्टाला ढोंगी, प्रस्थापित, बूर्झ्वा ठरविणारा रघूही चित्रपटात कांताच्याच तोंडून बोलतो, हे मात्र विलक्षण खटकले.

३) 'मुंबई दिनांक'मधून डी–कास्टा आणि जिवाजीराव शिंदे उचलणे ठीक; पण पानिटकर, मेथाशेट उचलण्याची आवश्यकता नव्हती. पानिटकर, मेथाशेट आणि स्मगलिंग या प्रकरणाचा घडणाऱ्या राजकीय नाटयाशी संबंध असला तरी त्यांचा फक्त उल्लेख पुरेसा होता. हा प्रत्यक्ष दाखवलेला भाग अतिशय सुरेख वठला असूनही संपूर्ण चित्रपटाचा विचार करता अतिशय ठिगळलेला वाटला.

४) चित्रपटात आणखी एक केलेला नव्हे पण झालेला बदल – 'सिंहासन' कादंबरीत येणारी मुख्यतः राजकीय मंचावरील रस्सीखेचीत भाग घेणारी बहुतेक प्रमुख पात्रे ही अतिशय थोडयाशा फरकाने सारख्याच ताकदीची आहेत. सी. अेम्. विश्वासराव दाभाडे, माणिकराव पाटील, रावसाहेब टोपले, दत्ताजी जाधव ही तुल्यबळ माणसे. नानासाहेब गुप्ते, बुधाजी गोडघाटे हीही चांगली सामर्थ्यवान माणसे. फक्त त्यांच्या एखाद्याच मर्मस्थळामुळे पेचात पकडली गेलेली. तर ही किंवा अशी अनेक व्यक्तिमत्त्वे या सत्तास्पर्धेत खडकासारखी पाय रोवून हालचाल करतात, परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करतात. चित्रपटात मात्र सी. एम्. विरुद्ध विश्वासराव आणि माणिकराव अशा बुद्धिबळाच्या डावात त्यांच्याकडून हलणारी मोहरी यापलीकडे या अन्य मंडळींचे सामर्थ्य प्रेक्षकाच्या डोळयांपुढे येत नाही. अर्थात असे होणे चित्रपटाच्या (मुख्यतः वेळेच्या) मर्यादा लक्षात घेता अपरिहार्य आहे, हे मला मान्य आहे.

५) चित्रपटात मला सर्वांत खटकलेला बदल म्हणजे पत्रकार दिगू टिपणीसची व्यक्तिरेखा. 'मुंबई दिनांक'मधील पत्रकार अय्यर आणि 'सिंहासन'मधील पत्रकार दिगू टिपणीस सर्वस्वी वेगळा आहे. कादंबऱ्यांमधील दोन्ही पत्रकारांशी तुलना न करता चित्रपटातील दिगू टिपणीस पाहिला तर तो फारसा काय अजिबातच खटकत नाही. चित्रपटात उभा केलेला दिगू अतिशय ताकदवान आणि प्रत्येक ठिकाणी उत्तम वट असलेला पत्रकार आहे. त्याच्या एका बातमीमुळे आधीचे सरकार गडगडले असा त्याचा लौकिक आहे. राजकीय घालमेलींच्या बाबतीत तो बराचसा तटस्थ असला तरी त्या घालमेलीत सक्रीय भाग घेणाऱ्यांना (मुख्यतः मुख्यमंत्री आणि डी–कास्टा यांना) तो वेळप्रसंगी मदतही करतो. आजूबाजूला घडणाऱ्या प्रत्येक घटनेचे नेमके वृत्तपत्रीय मूल्य त्याचे चाणाक्ष पत्रकारी डोळे बरोबर हेरतात. आत्यंतिक हालात दिवस काढणाऱ्या सामान्य माणसाबद्दल दिगूला प्रेम आहे, कदाचित त्याची स्थिती बदलावी अशी त्याची तळमळही असेल (म्हणूनच तो डी–कास्टाला मदत करतो.); पण म्हणून जादूची कांडी फिरल्याप्रमाणे ही परिस्थिती बदलेल अशी अपेक्षा करण्याइतका तो भाबडा असेल का? आपल्या जीवनात पाहिलेल्या, अनुभवलेल्या विविध अनुभवांनी आलेली काहीशी निबर परिपक्वता दिगूच्या शेऱ्यांमधून, त्याला गरजेच्या वेळी मान देणाऱ्या लोकांच्या मानभावीपणाला त्याने दाखविलेल्या तुच्छतेवरून, प्रत्येक माणसाचे झटकन विश्लेषण करून मोजमाप घेऊन त्याला दिगू जी वागणूक देतो त्यावरून दिसून येत नाही का? लोकांच्या आयुष्याची घडी ठरविण्याचा उद्देश व सामर्थ्य असलेली सत्ता वैयक्तिक स्वार्थाच्या गाडयाला जुंपली गेल्याने तिचे सामर्थ्य आपल्या उद्देशापासून खूप दूर गेले आहे, हे दिगूच्या केव्हाच लक्षात आलेले आहे. दिगू हळवा आहे तो फक्त शांताच्या बाबतीत. ती वेश्या असूनही त्याने तिच्यावर मनापासून प्रेम केले. तिच्या मृत्यूने दिगूला धक्का बसणे स्वाभाविक होते; पण शांताचा रोग, मृत्यू ही त्याची अपरिहार्य परिणती याही गोष्टी दिगूला माहीत होत्याच, मग त्याला तो धक्का पचविणे केवळ जडच नव्हे तर अशक्य का व्हावे? म्हणूनच चित्रपटाच्या शेवटी (शांताचा मृत्यू, राजकीय रंगमंचावरील बेगडी नाटक आणि सत्तावर्तुळात कितीही खळबळ माजली तरी शांत, निर्लेप असणारे सामान्यांचे चाकोरीबद्ध ओझे बनलेले आयुष्य या सगळयाचा एकत्रित परिणाम होऊन) वेडा बनणारा दिगू मनाला पटत नाही. या एकाच ठिकाणी चित्रपट अचानक भयानकपणाच्या वा अतिनाटयाच्या पातळीवर गेल्यासारखा वाटतो. या अचानक बदलामुळे दिगू परिपक्व पण हळवा असा न वाटता भाबडा वाटतो.

कादंबऱ्यांमधील दोन पत्रकारांचा विचार करता मला स्वतःला 'मुंबई दिनांक'मधील अय्यर अधिक आवडतो, अधिक उजवा वाटतो. 'सिंहासन'ची घटनाप्रधानता व त्यामुळे दिगू टिपणीसच्या व्यक्तिचित्रणातील अपुरेपणा ही त्याची कारणे असू शकतील. अय्यरच्या व्यक्तिरेखेतील त्याच्या व्यक्तिगत आयुष्याशीच संबंधित भाग (विशेषतः स्त्री-पुरुषसंबंधांबद्दलचे त्याचे विचार, अनुभव) सोडून दिला तरी पत्रकार म्हणूनही तो जास्त भिडणारा आहे. चित्रपटात घेतलेला दिगू व शांता–वेश्येचे प्रेम आणि शांताचा मृत्यू हा भाग म्हणजे अय्यर व सॅलीचे संबंध आणि सॅलीचा मृत्यू याचाच मराठी अवतार; पण चित्रपटातील दिगू व शांताचे प्रेम हे खूप भाबडे, एकनिष्ठ व एकपदरी आहे; तर अय्यर व सॅलीचे संबंध जास्त गहिरे आहेत. 'खरं सांगतो पोक्षे, आपला आयुष्यातल्या व्हॅल्यूजवर विश्वासच नाही. साली सगळी हरामखोरी! खऱ्या गोष्टी दोनच–' असं म्हणून पहिल्यांदा तोंडावर आणि दुसऱ्यांदा पँटीच्या बटनावर बोट ठेवणारा, शारीरिक वासनेचं भावनिक पातळीवर प्रोजेक्शन म्हणजे प्रेम असे मानणारा, असंख्य स्त्रियांशी संबंध असणारा अय्यर सॅलीशी नकळत प्रचंड जखडलेला आहे, त्यामुळेच सॅलीच्या मृत्यूची बातमी कळल्यावर तो दिङ्मूढ होतो, फोरास-रोडच्या वस्तीत वेडयासारखा पैसे वाटत फिरतो, सॅलीचे काही तरी देणे तो मानतो आणि त्यातून मुक्त होण्यासाठी धडपडतो. हा अय्यरच्या आयुष्यातील हळवा भाग. पत्रकार म्हणून अय्यर म्हणजे केवळ एक तुफान आहे. दिवसातील चार-पाच तास झोप सोडली तर हा माणूस अखंड परिश्रम करतो. स्वतःचे वैयक्तिक आयुष्य, भावना या गोष्टी अय्यरसाठी दुय्यम आहेत. त्यामुळे सॅलीच्या मृत्यूनंतर stunned झालेला अय्यर 'कास्टा हॅज बीन अटॅक्ड.' एवढे ऐकल्याबरोबर झपाटल्यासारखा कामाला लागतो. कोणामध्येही न गुंतता आपल्याला बातमी मिळावी एवढयासाठी फक्त प्रत्येकाचा वापर करून घेणे, एवढेच अय्यरला ठाऊक आहे आणि तो तसाच वागतो.

पत्रकार म्हणून 'सिंहासन' कादंबरीतील दिगू टिपणीसबद्दलही थोडयाफार फरकाने हेच म्हणता येईल.

कादंबरीतील हीच स्वभाववैशिष्टये कायम ठेवून चित्रपटातील दिगू टिपणीस उभा केला असता (विशेषतः शेवट बदलून) तर तो अधिक प्रभावी झाला असता असे मला वाटते. कादंबऱ्यांमधील वऱ्हाडी हेल व सुपारीझोपाळयासकट घेतलेले माणिकराव पाटील, दयानंद पानिटकर, डी-कास्टा इत्यादी लोक जसेच्या तसे घेतलेले असताना दिगू टिपणीसच्याही बाबतीत तसे करायला हरकत नव्हती. त्यामुळे चित्रपटातील सामाजिक संदर्भांना कुठे बाध आला असता, असेही मला वाटत नाही.

चित्रपटाची पटकथा रचताना तेंडुलकरांनी जी भर घातली आहे तीसुद्धा त्यांच्या पदरची वा वेगळी वाटणार नाही इतकी मूळ प्रवाहात मिसळून गेली आहे. उदाहरणार्थ डी-कास्टा व विश्वासराव दाभाडयांची भेट,

विधानसभेतील प्रश्नोत्तरे व भाषणे, मिसेस चंद्रापुऱ्यांसारखी काही पात्रे.

चित्रपटाचे दिग्दर्शक म्हणून डॉ. जब्बार पटेल यांची कामगिरी त्यांच्या डोक्यात आणखी एक मानाचे पीस खोचणारी आहे. मराठी चित्रपटात रूढ असलेल्या तमाशा, पाटील इत्यादी धंद्याच्या गोष्टी टाळणे हेच मुळात निर्मितीच्या दृष्टीने त्यांनी स्वीकारलेले एक आव्हान होते. ( जब्बार पटेल 'सिंहासन 'च सहनिर्मातेही आहेत.) शिवाय वेगळाच नव्हे तर सद्यःपरिस्थितीत काहीसा धोक्याचा विषय निवडून तो मांडणे हेही त्यांच्यासाठी आव्हानच होते आणि ते त्यांनी समर्थपणे हाताळले. कलाकारांची अचूक निवड, पात्रांची ( काही कादंबरीत उल्लेखलेली– माणिकरावांचा पितळी झोपाळा, सुपारी ) वैशिष्ट्ये, सर्व पात्रांमध्ये टाळलेला उथळपणा, भडकपणा आणि सगळ्यांनाच दिलेला एक आब, उंची, dignity ही संपूर्ण चित्रपटात आढळणारी वैशिष्ट्ये. बाकी बुधाजीला आपला फोन टॅप झाल्याचा संशय आल्यानंतर करडी नजर रोखलेल्या मुख्यमंत्र्यांच्या फोटोवरून कॅमेरा फिरणे, टी. व्ही., रेडिओ व वर्तमानपत्रांच्या बातम्यांचा उपयोग, flash-back इत्यादी युक्त्यांचा झकास वापरही सढळपणे केला आहे. शिवाय प्रत्येक प्रसंगात दिग्दर्शकाचा कोरीव व सफाईदार हात फिरल्याची जाणीव होते. उदाहरणार्थ– बुधाजीची चिठ्ठी आल्यानंतर तिची घडी करून मुख्यमंत्र्यांनी त्या घडीने कान कोरणे, निरनिराळ्या प्रसंगांचे पार्श्वसंगीत, घटनाप्रधान व तणावपूर्ण वातावरणातही स्त्रीपुरुषांच्या शारीरिक आकर्षणाचे विविध पैलू दाखविण्यासाठी टिपलेले काही क्षण.

चित्रपटातील एखाद-दुसरा अपवाद वगळता सर्व प्रमुख कलाकारांबद्दल लिहावे तेवढे थोडेच. विशेषतः अरुण सरनाईक, डॉ. श्रीराम लागू, दत्ता भट, रिमा लागू, श्रीकांत मोघे, सतीश दुभाषी, दिगंबर पितांबरे आणि निळू फुले या साऱ्यांनी प्रत्येक शब्दागणिक, प्रत्येक look, प्रत्येक gesture प्रत्येक pose मधून, चेहऱ्यावरील एकेका, रेषेच्या हालचालीतून आपली व्यक्तिरेखा फुलवली, जिवंत केली.

'सिंहासन'चे संगीत आहे हृदयनाथ मंगेशकरांचे. संपूर्ण चित्रपटात सुरेश भट यांचे ' उषःकाल होता होता काळरात्र झाली, अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली ' हे गीत वेगवेगळ्या प्रसंगांच्या पार्श्वभूमीवर तुकड्या–तुकड्याने वापरले आहे. अत्यंत आशयघन असे हे गीत पडद्यावरील दृश्यांमुळे (झोपडपट्टी, हातगाडीवाला, राबणारे मजूर थोडक्यात श्रमिकवर्ग, उकिरड्यावर अन्न वेचणारी पोरे, उघड्यावर बांधलेल्या झोळीतील लहान मूल, समुद्रकिनाऱ्यावर वाहून आलेले प्रेत – अशी खिन्न, उदास, निराश परिस्थितीचे दर्शन घडविणारी दृश्ये) आणि आशा भोसले आणि रवींद्र यांच्या सुन्दर आवाजांमुळे विलक्षण परिणामकारक बनले आहे; पण संपूर्ण गीतामध्ये कोरस हा प्रकार विशेषतः ' ल ल ला ल ल ला ' वगैरेच्या चालीवर म्हटला जाणारा कोरस–हा अतिशय चमत्कारिक व विसंगत आणि म्हणूनच गीताच्या परिणामाचा चढता आलेख खाली आणणारा वाटतो. पार्श्वसंगीतात काही गोष्टींचा आवर्जून उल्लेख करावा लागेल. १) श्रेयनामावली चालू असताना किंवा ती सुरू होण्यापूर्वीच फोननंतर अस्वस्थ मुख्यमंत्री गाडीतून घरी जायला निघताना काहीशा संथ वेगाने पण ऐकू येण्याएवढ्या मोठ्या व तीव्र आवाजात सुरू होणारे ठोके. त्यांची लय वाढत जाताना त्याबरोबरच वाढत जाणारा ताण. २) दुसऱ्या दिवशी धोक्याच्या कामावर जाण्याच्या हुरहुरीने अस्वस्थ झालेला पानिटकर आणि त्याच्या अस्वस्थपणामुळेच घाबरलेली त्याची बायको –पानिटकर तिला तिच्या व मुलांच्या तजविजीबद्दल सांगत असतानाच चालू असलेले 'जिवलगा, राहिले रे दूर घर माझे ', त्यातून तयार होणारे विलक्षण उदास वातावरण. ३)पानिटकरला मरताना डोळ्यांपुढे दिसलेली मुले, त्याच वेळी मागे ' Twinkle, twinkle, little star. ' ४) पार्टीच्या वेळी संपूर्ण पार्टीला, तेथील वातावरणाला आणि पार्टीत सामील झालेल्या सर्व लोकांनाही एका उच्चभ्रूपणाच्या रंगात बुडवून टाकणारे, dignity आणि descency देणारे ' मालवून टाक दीप. ' ५) याव्यतिरिक्त निरनिराळ्या वाहनांचे आवाज–हॉर्नपासून दाराच्या उघडझापीपर्यंत, ढोल-लेझीम, भजन इत्यादींचा नुसता उल्लेख करायचा म्हटला तरी एक वेगळा लेख तयार होईल.

'सिंहासन'चे छायाचित्रकार आहेत सूर्यकांत लवंदे. चित्रपटाची आतापर्यंतची ठळक वैशिष्ट्ये त्यांच्या कॅमेऱ्याने टिपली आहेतच; पण मुंबई दिनांक आणि सिंहासन या दोन्ही कादंबऱ्यांमधील दोन–दोन, तीन–तीन पाने वर्णने एका फटक्यात पडद्यावर साकार करून प्रेक्षकांपुढे समर्थपणे जिवंत करण्याचे कसब त्यांच्या छायाचित्रणात आहे; मग ते एखाद्या बकाल झोपडपट्टीचे दृश्य असो वा अर्थमंत्री विश्वासराव दाभाडयांचा राजेशाही बंगला आणि राहणी असो. चित्रपटात एक डोळा दिग्दर्शकाचा मानला तर दुसरा छायाचित्रकाराचा असतो. ' सिंहासन'चे हे दोन्ही डोळे चांगलेच तेज होते. वेगवेगळ्या व्यक्तिरेखा त्यांच्या वैशिष्ट्यांसकट टिपणे, वेगवेगळे प्रसंग त्यांच्या भावरंगांसकट उभे करणे इत्यादींमध्ये असलेल्या सूर्यकांत लवंद्यांच्या सिंहाच्या वाटयाचा वेगळा उल्लेख करायलाच पाहिजे, असे नाही.

' सिंहासन ' मधील लौकिकार्थाने यशस्वी झालेल्या सर्व पात्रांच्या बाबतीत जाणवणारे एक वैशिष्ट्य म्हणजे आयुष्यातील (आपल्या वा दुसऱ्याच्या) प्रत्येक बारीक-सारीक घटनेचा वापर या पात्रांनी आपले ईप्सित साध्य करण्यासाठी करण्याचा प्रयत्न केला. मग ती घटना म्हणजे हरिजनांचे मृत्यू असोत, कारखान्यांचे संप असोत, दुष्काळ असो वा एखाद्याच्या खासगी आयुष्यातील डाग असो; प्रत्येक माणूस शेवटी आपले हित जपण्याचा प्रयत्न करणारा, बाकी गोष्टींशी त्याला काही सोयरसुतक नाही. आतापर्यंत राजकीय भांडवल, भ्रष्टाचार, पाठिंबायाद्या इत्यादि छापील खिळ्यांमधेच बंद असलेले सत्ताकारण 'सिंहासन'च्या रूपात जिवंत मानवी अनुभूतीच्या पातळीवर आले, हे सिंहासनचे सर्वात मोठे यश आहे.

# रौप्यमहोत्सवी नाट्यसंमेलन

पृष्ठ ८ वरून

निर्मात्यांनी पहावेत. नंतर माझ्यावर ठपका नको. मी जू ओढीन पण आसुडाचा धाक दाखवू नये.'

आपल्या लेखी भाषणात संगीत रंगभूमीबद्दल त्यांनी विचार मांडले आहेत. पूर्वीच्या संगीत नाटकांइतके हल्लीच्या संगीत नाटकातले संगीत नाट्यकथानकाशी एकजीव झालेले आढळत नाही. नाटकाशी संगीत एकजीव होण्यासाठी नाटकातील पदांची स्थाने योग्य असावी लागतात. गाणे मग ते नाटकातले असो की कोणतेही असो, ते गोडच असायला पाहिजे. निर्मात्यांनी व्यवसाय करावा–धंदा करू नये. नाटक ही सात्त्विक मनोरंजनकला आहे.

याच दिवशी म्हणजे तेवीस तारखेला विविध मनोरंजनाचे कार्यक्रम होते. श्री. बापूराव माने यांच्या 'मी जिजाऊ' या कार्यक्रमापासून सुरुवात झाली. श्री. बापूराव माने यांनी उभी केलेली जिजाऊ एकदम जुन्या काळात म्हणजे पुरुष जेव्हा स्त्रीपार्ट करीत होते त्या काळात प्रेक्षकांना घेऊन गेली. कनका रेळे आणि चारुशीला साबळे यांनी आपल्या नृत्यातून निरनिराळे भावदर्शन घडविले. प्रा. लक्ष्मण देशपांडे यांच्या लंडनला निघालेल्या वऱ्हाडाने प्रेक्षकांना एक दीड तास खो खो हसत ठेवले. 'बटाट्याची चाळ' नंतर इतका रंगलेला एकपात्री प्रयोग खूप वर्षांनी पहायला मिळाला. 'आक्रंदन एका आत्म्याचे' या आपल्या कथनात श्री. वसंत पोतदार यांनी बाबा आमटे यांचे समग्र चरित्र, त्यांचे कौटुंबिक जीवन, ध्येयजीवन लोकांच्या डोळ्यांसमोर उभे केले.

¤

दुसऱ्या दिवशी सकाळी पावणेअकरा वाजता शाहूसभागृहात 'प्रायोगिक रंगभूमी दिशाहीन झाली आहे' या विषयावर परिसंवाद झाला. अध्यक्ष होते. श्री. दामू केंकरे. प्रथम बोलले श्री. कमलाकर सोनटक्के. ते म्हणाले, 'प्रायोगिक रंगभूमी ही ठराविक दिशेने वाटचाल करणारी नसते. नव्या दिशा धुंडाळणे हेच तिचे काम. प्रयोग करायचे तर परंपरेचे जोखड झुगारलेच पाहिजे! पीडीए., रंगायन यांनी पूर्वपरंपरेत धडक देत, बिचकत नवे प्रयोग केले. तेव्हा नवी दृष्टी मिळाली. लोककथा ७८, अलवरा डाकू यात नवा mode रंगभूमीने घेतला. घाशीराममधे माणसाचे शरीर वेगळ्या आकारात सादर केले. काही लोकांनी मात्र प्रयोगाच्या जत्रा केल्या. याचे उदाहरण 'अजब न्याय वर्तुळाचा!' 'महानिर्वाण'मध्ये कीर्तनाचा उपयोग चांगला केला. मरणाचे गंभीर पापुद्रे हलके हलके काढीत आळेकरांनी एका हॅम्लेटला जन्म दिला. मी म्हणतो, कामू सार्त्र माझ्या मातीत मी कसा शोधेन हे पहायला पाहिजे. आजचे आक्षेप प्रायोगिकवरचे म्हणजे हे ड्रील करतात. ड्रील करायला काय हरकत आहे? तरुणापुढे आदर्श कोणता? पदापदाला मूल्याचे अवमूल्यन होत आहे! समष्टीच्या रूपाने मी नाट्याविष्कार केला तर मी समाजाच्या अधिक जवळ जातो. जीवनाला सुसंगत कथा नाही. मग नाटकात ती का अपेक्षिता? पाश्चात्य रंगभूमीवर हेच झाले. टॉपलेस, बॉटमलेस, नग्नसंभोग. आता पाश्चात्यांचे डोळे भारतीय लोकनाट्याकडे लागले आहेत. प्रायोगिक रंगभूमी दिशाहीन झाली आहे. तिला दिशाहीनच होऊ द्या!'

श्री. सोनटक्के यांचे बोलणे 'पारिभाषिक छबीलदासी' होते. त्यामुळे ते विस्कळीत असणे स्वाभाविकच होते. मला एवढेच विचारायचे आहे. जीवनाची सुसंगत कथा असे म्हणताना सोनटक्के यांना काय अभिप्रेत आहे?

नंतर बोलताना श्री. भालबा केळकर म्हणाले, श्री. सोनटक्के यांनी सांगितले प्रयोग दिशाहीनच असतात. पण ते सर्वस्वी खरे नाही. प्रयोग करणाऱ्यांना दिशा असते. ती प्रेक्षकापर्यंत पोहोचली नाही तर त्यांना ते दिशाहीनता वाटते. के. ना. काळे म्हणत, करून पाहिलं याला महत्त्व नाही. मी या 'दृष्टीने' केले याला महत्त्व. प्रायोगिक म्हणून काही अस्तित्वात आहे का? असं का म्हणावसं वाटतं? जे प्रायोगिक ते सीमित आहे का? old wine in new bottle असा प्रकार आहे का? प्रयोग हा व्यक्तिसापेक्ष असतो. रंगभूमीला कोणताही रस वावडा नाही. बीभत्साचे रसरूप कायम राहिले तर बघवते. ते बीभत्स झाले की प्रेक्षक शरीराने चाळवला जातो. ते होऊ नये! मी नव्या पिढीवर रागवत नाही. काय करता बघायचं आहे. आम्हाला समजत नाही तर समजावून द्या.' दिशाहीनतेबद्दल योग्य विधान करून श्री. भालबा बाकी सगळ गुळगुळीत गोलमालच बोलले. त्यांच्यानंतरचे वक्ते होते. श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर. 'भालबांनी बसू घातलेला परिसंवाद उभा केला.' अशी भालबांची पाठ थोपटून त्यांनी भाषणाला सुरवात केली. ते म्हणाले, 'प्रायोगिक रंगभूमी तितकी दिशाहीन नाही. प्रयोग हा शब्द अलीकडे आला. वृत्ती जुनीच. किर्लोस्करांचे 'शाकुंतल' हा एक महान प्रयोग होता. प्रयोगांसाठी आम्ही नागपूरचे लोक मुंबई–पुण्याकडे नजर ठेवून होतो. विजया मेहता, दामू केंकरे यांच्या परिश्रमाचे फलित 'छबिलदास'. प्रायोगिकांचा मूळ पुरुष 'एक शून्य बाजीराव'. त्यापासून ते 'अलवरा डाकू' पर्यंतचा प्रवास पाहिला तर एक वृत्ती दिसते. व्यावसायिकांशी स्पर्धा दिसते. प्रायोगिक नाटके करणाऱ्यांचा प्रामाणिक समज होता, रंगभूमी प्रेक्षकनिरपेक्ष असू शकते. पुढे तो बदलला. प्रयोग करतो तो अपेक्षा बाळगून नाही म्हणून त्याची उपेक्षा होत नाही. 'सोफा कमबेडचा' प्रयोग लेखक अच्युत वझे आणि दिग्दर्शक सत्यदेव दुबे यांनी वेगळ्या पद्धतीने केला. मला दोन्ही आवडले. मी हे प्रसादचिन्ह म्हणतो. प्रमादचिन्ह म्हणत नाही. संख्यात्मक दृष्टीने प्रायोगिक नाटकाला मरगळ आली आहे. डॉ. लागू, अमोल पालेकर गेले. त्या ताकदीची माणसे आली नाहीत. दिशाहीनतेची भीती खरी नाही, रंगभूमी घडवतो, बिघडवतो प्रेक्षकच. प्रायोगिकने जे नवीन आम्हाला दिले ते आम्ही व्यावसायिकमधे नेले. कधी यशस्वी झालो कधी अयशस्वी!' प्रायोगिकला एकसारखे कुरवाळीत श्री. दारव्हेकरांनी आपले दिशाहीन भाषण संपविले. नंतर बोलायला पुढे आले श्री. कमलाकर नाडकर्णी. ते म्हणाले, 'गेल्या वर्षी' प्रायोगिक रंगभूमी म्हणजे काय?' हा विषय आणि या वर्षी हा विषय म्हणजे

शोधच थांबला. शोध घ्यायची गरज वाटत नाही. ड्रील केली की झाले. प्रायोगिक संहितेची तशी मागणी असली तर ते ड्रील वाटत नाही. वर्तमानपत्रातल्या बातम्या चिकटवल्या, त्यांच्यामागे पात्रांची नावे घातली की झाले प्रायोगिक नाटक. सैनिकाच्या एका हातात रायफल, दुसऱ्या हातात कबुतर की झाले प्रतीक– आमच्या सामान्य माणसाचा या नाटकात शोधच घेतला जात नाही. तरी मी निराश नाही. प्रायोगिकतेची चौकट झाली आहे ती मोडायला कोणीतरी येईलच ! दिशाबिशा काही नाही. दिशाहीन झाली असेल तर ती व्यावसायिक रंगभूमीच !' श्री. नाडकर्णी अगदी तावातावाने बोलले. त्यांनी केलेले प्रायोगिक रंगभूमीबद्दलचे निदान अचूक वाटले; पण व्यावसायिक रंगभूमी दिशाहीन कशी झाली हे आपले विधान त्यांनी स्पष्ट केले असते तर बरे झाले असते. यानंतरचे भाषण होते पुष्पा भावे यांचे. त्या म्हणाल्या, 'चर्चा करायला ही जागाच चुकीची. टेबलाभोवती गंभीरपणे ही चर्चा व्हायला पाहिजे; पण आपण सगळ्याच गोष्टी उत्सवात करतो. केळकर आणि दारव्हेकर यांनी आपली 'आम्ही काही जुनेबीने नाही हं ! तुम्हाला समजावून घ्यायला तयार आहोत' अशी आपली पालकांची भूमिका घेतली. नाडकर्णी कळकळीने बोलले. मी म्हणते प्रायोगिक रंगमंचावरची दोन माणसे चित्रपटात गेली म्हणून ती बंद पडत असेल तर ती प्रायोगिक रंगभूमीच नाही. रंगमंच बदलला हे खरे; पण काही बदल कालाच्या प्रवाहात आपोआप होतात. ते प्रयोग नव्हेत. हेतुपुरःसर जे बदल होतात ते प्रयोग. प्रायोगिक रंगमंच ही जीवनदृष्टी आहे. ती चळवळ नाही. प्रायोगिक रंगमंचाने काही नवीन केले का ? दलित कथा, कविता निर्माण झाल्या तशी दलित रंगभूमी का निर्माण झाली नाही ? निग्रो रंगभूमीसारखी रंगभूमी आपल्याकडे नाही. इब्सेन आपण मराठीत आणतानाच चुकीचा आणला. मराठीने नेहमी तपशील घेतले. गाभा घेतला नाही.' आपला पहिला मुद्दा अगदी मार्मिक मांडून पुष्पाबाईंनी पुढे विस्कळीतच भाषण केले. त्यांच्यानंतर श्री. विजय बोंद्रे बोलले. ते म्हणाले, 'येथे बोलायला मला दोन क्वालिफिकेशन्स आहेत. मी प्रायोगिक रंगभूमीचा आहे आणि मी तुमच्यापैकी बऱ्याच लोकांना माहिती आहे. मी दिग्दर्शक असल्यामुळे पेपरवर्कची सवय आहे. म्हणून मी पेपर लिहिलेले आणले आहेत. मी आणि नाडकर्णी प्रामाणिक आहोत. आमच्या चुका कबूल करायला आणि उपाय शोधायला तयार आहोत. छबिलदासला आम्ही चळवळ म्हटले ही आमची चूक झाली. चळवळ म्हटलं म्हणून आम्ही क्रूसेडर ठरलो. वाटलं, आम्ही जिंकलो ! आम्ही डोक्यावरून सेट नेतो याचं कौतुक. बाहेरच्या मोडक्या पायऱ्यांचं, बाकाचं कौतुक. या अभिमानाचा दुराभिमान झाला. छबीलदासची फिल्म टी. व्ही. वर दाखवली. It should be preserved येथपर्यंत ते कौतुक गेलं. त्या दुराभिमानामुळे 'शिवाजी मंदिर'चा तिटकारा वाटू लागला. Form, technique असा एक Canvass thought आहे; पण आम्ही तो केला नाही. आम्ही अभ्यासच केला नाही. अभ्यास नकोच ही वृत्ती बळावली. अर्थ गेला. उच्चार राहिला. दुर्बोधतेला प्रायोगिक म्हटले, त्या नादात स्वतःलाच अगम्य असे काही केले. टीका, appriciation of word हा शब्द आमच्या डिक्शनरीत कधी आलाच नाही. डॉ. लागूंनंतर मीच, सत्यजित रेनंतर मीच अशी भूमिका झाली. यामुळे zeropercent growth किंवा negative growth झाली. आज खरोखरीच ही नादानी म्हणावी लागते; पण महत्त्वाचा भाग मी आत्मपरीक्षण केले. आम्ही निराश नाही. थकलो नाही. आम्ही स्वतःला तराजूत घालून घ्यायला तयार आहोत. Democracy of intellect आम्ही preserve करू. चित्रपटाकरिता आम्ही प्रायोगिक नाटके करणार नाही. आम्ही भांबावलो आहोत. वळून पाहून पुढे जाणार आहोत.' या भाषणानंतर प्रेक्षकातून ओरडा झाला. 'यांच्या इंग्लीश शब्दांचे अर्थ सांगा.' 'मराठी शब्द वापरा. ही मराठी नाट्यपरिषद आहे.' असो ! 'मी पेपरवर्क करतो. मी आणि नाडकर्णीच प्रामाणिक' हे बोंद्रे यांनी कशासाठी सांगितले ? प्रायोगिक रंगमंचाचे एक कडवे पुरस्कर्ते अशी बोंद्रे यांची सर्वसाधारण प्रतिमा आहे. यामुळे त्यांचे भाषण धक्का देणारे वाटले. काही वर्षांपूर्वी विलेपार्ल्यात त्यांनी ड्रील शैलीच्या प्रायोगिक नाटकांचा धडाका उडवून दिला होता. त्यांना तरुण मुलांचा भगतगणही मोठ्या प्रमाणावर लाभला होता. हा भगतगण त्यांच्या प्रायोगिक नाटकांचा प्रचार करीत, 'गॉसिप'ला सभासद मिळवीत पार्ल्यात फिरत असे. एकदा तर असेही कळले, श्री. बोंद्रे आपल्या भगतगणासह एका हाउसिंग सोसायटीतील संमेलनाच्या नाटकाला गेले आणि तेथे चाललेल्या फार्सिकल नाटकांकडे पाठ करून बसले. खरे–खोटे देव जाणे ! पण असा त्यांच्या प्रायोगिकच्या अभिमानाचा लौकिक ! असे हे बोंद्रे हे काय बोलले ? का बोलले ? एवढे मोठे परिवर्तन होताना त्यांच्या मनाने, विचाराने कोणता प्रवास केला ? या परिवर्तनामागे आत्मपरीक्षण एवढे एकच कारण असू शकेल का ? बोंद्रे यांचे हृदयपरिवर्तन झाले, आता त्यांच्या भगतगणांचे काय होणार ? असे अनेक प्रश्न मनात उभे राहिले ! श्री. बोंद्रे यांनी जाहीरपणे स्वतःच्या चुका सांगितल्या यांचे खरोखर कौतुक वाटते. या प्रांजळपणाबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन. यानंतर श्री. विहंग नायक यांनी आपले विचार मांडले. प्रथितयश लेखकांनी प्रायोगिक रंगभूमीकडे दुर्लक्ष केले. यामुळे ते जनमानसाला भिडले नाही. प्रतिभावंत दिग्दर्शकाला आव्हानात्मक संहिता देण्याची जबाबदारी स्वीकारली नाही. शिबिरांमुळे तरुण कलाकारांची संख्या वाढली, अगदी गिरणीतून पीठ निघावे तशी ! असे विचार श्री. नायक यांनी व्यक्त केले. शेवटी बोललेले श्री. वासुदेव पाळंदे म्हणाले, 'आम्ही अनुकरणप्रिय– लागूंसारखे बोलायचे. कपड्यांपासून खांद्यावरच्या झोळीपर्यंत सगळीच नक्कल ! प्रयोग आता बालरंगभूमीवर व्हायला हवेत !' श्री. केंकरे यांनी समारोपाच्या भाषणात सांगितले, 'असे परिसंवाद होऊ नयेत. त्यातून काही साध्य होत नाही.' आणि समारंभ संपला.

या दिवशी म्हणजे चोवीस फेब्रुवारीला 'शतरंग' हा मराठी संगीत रंगभूमीची शंभर वर्षांची वाटचाल दाखविणारा कार्यक्रम सौ. सुहासिनी मुळगावकर यांनी सादर केला. किर्लोस्करांच्या शाकुंतलाच्या नांदीने रात्री साडेनऊच्या सुमाराला सुरू झालेला हा कार्यक्रम 'लेकुरे उदंड झाली' या नाटकातील गीतात्मक संवादापर्यंत येऊन भरतवाक्यानंतर रात्री दीड वाजता संपला. प्रत्येक नाटकातील पदापूर्वी त्या नाटककारांची आणि कलाकारांची स्लाइडचित्रे दाखविण्यात येत. निवेदक आवश्यक ती माहिती देत आणि नंतर पदाला सुरुवात होई. कार्यक्रमाचे स्वरूप असे आखीवरेखीव असल्या-

मुळे स्थूलमानाने संगीत रंगभूमीचा इतिहास डोळ्यांसमोर सरकत होता. कुंदा वेलींग (' मंदारमाला '–रंगभूमीवरील अनेक ज्येष्ठ, श्रेष्ठ आणि नवोदित कलाकारांनी शतरंग-मध्ये भाग घेऊन तो यशस्वी केला.

दि. २५ फेब्रुवारी या दिवशी ठरलेल्या वेळेपेक्षा पाऊण तास उशीरा म्हणजे सकाळी पावणेअकरा वाजता 'व्यावसायिक रंगभूमीच्या अधोगतीस निर्मातेच जबाबदार आहेत !' या विषयावर परिसंवाद सुरू झाला. अध्यक्ष होते श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर. त्यांनी सुरुवातीला सांगितले – कोणाची संस्था, नाटके, नट यांची नावे न घेता बोला. पहिले वक्ते होते श्री. भालबा केळकर. ते म्हणाले, 'मी व्यावसायिक नाही. व्यवसायाची मला जाणीव नाही. अधोगती कोणाची ? प्रयोगाची की निवडीची की भोवतीच्या गोष्टीची ? हे स्पष्ट नाही म्हणून बोलणे कठीण. मागणी तसा पुरवठा म्हणून पैशासाठी चालते ती धंदेवाईक रंगभूमी. प्रयोगाच्या बाबतीत अधोगती वाटत नाही. नक्की काय झाले ते मला सांगता येत नाही. रेप सीन मध्ये वस्त्रहरण झाले. किंचाळणे हसणे झाले. मग मी म्हणतो आणखी पुढे का जात नाही ? उत्तर असते, कोठे तरी थांबले पाहिजे ! मग आधीच का थांबत नाही ? बॉक्स ऑफिससाठी असे करावे लागते. प्रथितयश नटांच्या कोणत्याही आवडी पुरवून त्यांना आणावे लागते. निर्माते कणखरपणे हे थांबवू शकत नसतील तर त्यांनाच त्यांच्या अधोगतीची शंका येते. त्यांचे हे विधान खरे असण्याची शक्यता आहे. हे माझं final मत नाही.'

श्री. प्रमोद नवलकर म्हणाले, अधोगती होते आहे हे म्हणणे अन्यायाचे आहे. जे घडत असेल ते निर्मात्यांमुळे असे म्हणणेही चुकीचे. प्रत्येक शब्दाची व्याख्या केली असती तर बरे झाले असते. व्यावसायिक आणि धंदेवाईक असा फरक करायला मी तयार नाही. रंगभूमीवर जे येते ते सर्वस्वी निर्मात्याचे नसते. विषय लेखकावर सोपविलेला असतो. दिग्दर्शकाने कोणते निकष लावावेत हेही निर्माता सांगू शकत नाही. सेट कसा लावायचा तेही तो ठरवीत नाही. लेखकांनी विषय शोधावेत. झोपडपट्टीत फक्त दारू नसते. माणुसकी असते, अश्रू असतात. लेखकांनी त्याचा खोल जाऊन शोध घ्यावा. निर्मात्यांची भूमिका व्यवस्थापकाची, मालकाची असते. दुर्दैवाने ते ती नीट पार पाडीत नाहीत.

' माझं रंगभूमीवर प्रेम आहे. एक सांगतो, जेव्हा कलाकारांची अवकृपा झाली तेव्हा या निर्मात्यांनी रंगभूमी तारली. एक कठोर सत्य आहे–चांगली नाटके हाऊसफुल्ल जात नाहीत. दूरचित्रवाणीचे आक्रमण होते आहे. रविवारचा दूचिवावरील चित्रपट नाटकाच्या दोन्ही प्रयोगांच्या वेळा मारतो. निर्मात्यांनी दूरचित्रवाणीला सांगितले पाहिजे रविवारी चित्रपट दाखवू नका ! आम्ही रंगभूमीला मंदिर म्हणतो.'

पुढचे वक्ते होते, श्री. कमलाकर सारंग. ते म्हणाले, ' नाटक करणारे हजारो कलाकार असतात. एक किंवा दोन घाण करणारे असतात. वर्तमानपत्रांनी त्यांचा बाऊ करण्याचे कारण नाही. कितीही चढलेला नट आम्ही खाली खेचू याची मी ग्वाही देतो. प्रेक्षकांना अडचणीत टाकून आम्हाला नाटके करायची नाहीत.' यानंतर बोलणाऱ्या ललिता बापट म्हणाल्या, ' नवलकर हुशार वकिलासारखे स्वतःहून निर्मात्यांना पाहिजे ते बोलले. निर्मात्यांनी डाव साधला, सामाजिक कार्यकर्त्यांकडून कबुली घेतली. भालबांची मखलाशी म्हणजे मला काही माहीत नाही. मी समीक्षक. निर्माते इतके हुशार की काल आम्हाला ' F ' Row दिली. F म्हणजे फुकट. सारंगांची मखलाशी म्हणजे ' तुम्ही आमची नाटकं बघू नका.' आमच्यावरची जळफळ अशी व्यक्त केली. मी म्हणते, आम्ही नाटकवेडे आहोत. निर्माते नसले तरी नाटक करूच ! नवीन जीवनस्पर्शी नाटके येत आहेत. हे इच्छाभोजन आहे. कुणाला बेवडा हवा. कुणाला दूध हवे. जे पाहिजे ते घ्यावे. यांचा डाव लक्षात घेऊन यांचा गुणगौरव मला करायचा तो करून मी माझे भाषण संपविते.' ललिताबाईंना सर्वांच्या मखलाशा कळल्या पण आपल्याला कोणत्या विषयावर बोलायचे ते कळलेच नाही असे त्यांचे भाषण ऐकून वाटले. श्री. बाळ कोल्हटकर म्हणाले, ' माझ्या पोटाचा धंदा म्हणून मी पोटतिडकीने बोलतो. मला वाईट लिहिता येत नाही म्हणून मी चांगलं लिहितो. स्टेजवर साड्या सोडलेल्या प्रेक्षकांना आवडतात असं जे निर्माते म्हणतात ते गुन्हेगार असतात. राजकारणावर नाटक लिहिताना त्यासाठी घाणच का दाखवायची ? ' सीमेवरून परत जा ' मध्ये मी देशप्रेम दाखवलं आहे. लेखक अगतिक असतो. मला पाहिजे ते लिहीन असे तो म्हणत नाही.' डॉ. वि. भा. देशपांडे म्हणाले, ' एका बाजूला कलात्मक नाटकांचा प्रवाह आहे. दुसऱ्या बाजूला धंदेवाईक नाटके आहेत. ' संध्याछाया ' ' बॅरिस्टर ' यांना कलात्मक दर्जा आहे. काही निर्माते लेखकांना ठेवतात. पाहिजे तशी नाटके लिहून घेतात. दुष्ट प्रवृत्ती अधोगतीला कारणीभूत होते.'

खुल्या अधिवेशनात महत्त्वाचे ठराव संमत झाल्यावर श्री. भाऊसाहेब सप्रे यांनी शाल देऊन श्री. भालबा केळकर आणि श्री. छोटा गंधर्व यांचा सत्कार केला. छोटा गंधर्व म्हणाले, " शाखा वाढतील तेवढ्या चांगल्याच म्हणजे वृक्षांची सावली अधिक मिळेल. निर्मात्यांनी एकजुटीने संमेलन भरविले. ही एकजूट कायम रहावी.' आभारप्रदर्शन होऊन कार्यक्रम संपला.

रात्रीच्या कार्यक्रमाची सुरवात थोड्या वेगळ्या कार्यक्रमाने झाली. रंगभूमीवर प्रेम करणाऱ्या परंतु कोणत्याच प्रकारचा मानमरातब न मिळालेल्या व्यक्तींचा सुशीलकुमार शिंदे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. पहिले मानकरी होते सावळेराम मांजरेकर. शिवाजी मंदिर झाल्यापासून ते तेथे डोअरकीपर आहेत – केवळ रंगभूमीच्या प्रेमाने. दिवसा पोस्टात नोकरी करतात. दुसरे श्री. भैरव हातवळणे हे नट. त्यांचे वय आज सत्त्याऐंशी आहे. आणखी एक मानकरी लेखक व सुमंत जोशी हे होते. सरस्वतीबाई बोडस, द. रा. केळुसकर यांचा कलाकार म्हणून तर श्री. मदन मोहन लोहिया एक निर्माते म्हणून आणि भार्गवराम पांगे यांचा बॅक स्टेज जाणकार म्हणून सन्मान करण्यात आला.

नंतर थोड्याच वेळात शाहीर साबळे यांचे ते पेट ' आवूराबाचे लगीन ' सुरू झाले. ते सुमारे अकराच्या सुमाराला संपले. त्यानंतर छोटा गंधर्वांच्या गायनास सुरुवात झाली ते अडीच वाजेपर्यंत चालले. सभामंडप तुडुंब भरला होता. बाहेर लॉनवरही किती तरी लोक मजेत बसले होते. हवा थंड होती. स्वर वहात होते कोणीही गाडी, घराच्या मागे धावत नव्हते.

भरत नाट्य-संशोधन मंदिर आणि श्री. के. टी. देशमुख यांनी आयोजित केलेली प्रदर्शने हे या संमेलनाचे विशेषण आकर्षण होते. □